परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष १९, अंक २. जून – जुलै २०२५

### मुखपृष्ठाविषयी

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च्।
तस्मादपरिहार्येऽर्थेन त्वं शोचितुमर्हसि ।।
(भगवद्गीता अ.२, श्लोक २७)

या उक्तीप्रमाणे जो जन्माला आला त्याला मृत्यू आहेच आणि ज्याला मृत्यू आला त्याला पुनर्जन्म निश्चित आहे. ह्या अटळ गोष्टीविषयी शोक करणे उचित नाही. आपण आध्यात्मिक वाटचालीवर मार्गस्थ आहोत; पण अजून संपूर्ण उंची गाठली नाही त्यामुळे दादी रतनमोहिनींचे निर्वाण ही न विसरता येणारी गोष्ट आहे. सिंध हैदराबादेत सुरू झालेला ज्ञानयज्ञ कसा विकसित होत गेला त्याच्या एक साक्षीदार दादीजीदेखील होत्या. १४ वर्षांची उग्र आत्मानुभवाची साधना, त्यानंतरचे सेवाव्रत आणि कठोर परिश्रमांची कार्यशाळा या सगळ्यातून त्यांचे जीवन उजळत गेले. ती एक प्रकाशज्योत संस्थेतील पुढील पिढीस कायमच मार्गदर्शक ठरेल. तसेच शेवटच्या पानावरील मातेश्वरींचे चित्र त्यांनी आईसमान दिलेल्या संगोपनाची सदोदित आठवण देत राहते. संस्थेच्या प्रथम प्रशासिका मातेश्वरी जगदंबा आणि त्या पिढीतल्या शेवटच्या प्रमुख प्रशासिका दादीजी या दोघींच्या स्मृतीस अभिवादन करून हा अंक आपल्या हाती ठेवताना धन्यता वाटत आहे.

– प्रकाशिका




| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय...निग्रही नेतृत्त्व | २ |
| २. | दिव्यत्वाची जेथ प्रचीती | ४ |
| ३. | चिरतरुण दादींचे अव्यक्तारोहण ! | ६ |
| ४. | 'लाईट हाउस' – सेंट पीटर्सबर्ग रशिया | ८ |
| ५. | देवाशी संवाद | १० |
| ६. | कर्महिशेब आणि वैश्विक नाटक | १२ |
| ७. | ''बाबांकडून नवजीवन मिळाले'' | १३ |
| ८. | आत्मा आणि शरीर दोन्हीस स्नान | १५ |
| ९. | सिस्टर मोनिका– कॅनडा, अनुभवाचे बोल | १६ |
| १०. | परीकथा (भाग २०) | १९ |
| ११. | चिंतन | २१ |
| १२. | आरोग्य रहस्य | २२ |
| १३. | दादी रतन मोहिनी यांचे काही मौलिक विचार | २३ |
| १४. | 'आत्म उन्नतीचा मार्ग सापडला' | २५ |
| १५. | ''अंग–अंग फुलागत उमलले'' | २६ |


**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व)–४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints, 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), Pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye

वार्षिक वर्गणी रु. ८५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,५००/–, एका अंकाचे रु. १४/–
E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com

संपादकीय ...

# निग्रही नेतृत्त्व

ब्रह्माकुमारीज संस्थेच्या 'ईश्वरी ज्ञानमार्गात' चार प्रमुख विषय आहेत. ज्ञान, राजयोग, दिव्य गुणांची धारणा आणि सेवा. या चार विषयांच्या चार मोठ्या पाकळ्या जर जीवनात पूर्णपणे विकसित झाल्या तर जीवनरूपी कमळ संपूर्णपणे विकसित झाले असे म्हणता येईल. हीच या मार्गाची फलश्रुती आहे. सर्व आदि रत्ने अर्थात दादी, दीदी मंडळींचे जीवन हे असेच होते. दादी रतनमोहिनी त्याला अपवाद कशा असतील? दादीजींचा जीवनपट उलगडून पाहता अनेक गोष्टी समोर येतात. २५ मार्च १९२५ रोजी सिंध हैदराबाद (आता हा भाग पाकिस्तानात आहे) येथे झाला. त्याकाळच्या सर्वसामान्य प्रथेनुसार घरात भक्ती-भावाचे वातावरण होते. दादीजी स्वतः त्याचा अनुभव वर्णन करत- माझे नाव 'लक्ष्मी' ठेवले होते. लहानपणापासून मी लाजाळू, भिडस्त स्वभावाची असल्याने कमी बोलत असे. मला शिक्षणात फार रुची असल्याने अभ्यासात वेळ घालवणे अधिक पसंत असे. त्या काळानुसार करत असलेल्या पूजा-पाठ, भक्तीचे फलित म्हणून मला या ईश्वरी ज्ञानमार्गाची प्राप्ती झाली. या ज्ञानमार्गाकडे मी ओढले गेले तेव्हा माझे वय जेमतेम १३ वर्षांचे होते.

**दादींचा प्रथम अनुभव**

त्यांनी ॐ मंडळींचे नाव त्यापूर्वी कधीही ऐकले नव्हते. त्यांच्या आईला, दादी 'देवी' यांना प्रथम सत्संगात जायची संधी लाभली. त्याचे असे झाले, मनमोहिनी दीदींची आई त्यांना सगळेजण 'क्वीन मदर' म्हणत.



त्या देवीबेनकडे एकदा गेल्या आणि आग्रह केला, जवळच असलेल्या 'ओम मंडळी' नावाने ओळखल्या जाणाऱ्या सत्संगात चल. आईसोबत गेलेल्या रतनमोहिनी दादी तिथे पहिल्या रांगेत बसल्या. ब्रह्माबाबांचे सभेत आगमन झाले आणि प्रथम दृष्टीतच जणू काही जादू घडली. रतनमोहिनी दादी त्यांच्याकडे एकटक पाहत राहिल्या. बाबांच्या मुखातून 'ओम ध्वनी' बाहेर पडला आणि दादीजी देहभान हरपलेल्या अवस्थेत गेल्या. अथांग शांतता आणि अपूर्व आनंदाचा ठेवाच गवसला. वय लहान असल्याने हे सगळं शब्दात व्यक्त करणं कठीण होतं; पण ते अनुभूतीच्या पातळीवर सुस्पष्ट होतं. बाबांच्या द्वारे कुठलीतरी उच्च शक्ती ज्ञान सांगतेय हा अनुभव त्यांना देहातीत अवस्थेत होत गेला. साधारण तासाभरात सत्संग संपला; पण दादीजी ध्यानावस्थेतून उतरल्या नव्हत्या. त्यांच्या आईने, देवीबेनने त्यांना हलवून भानावर आणले. तिथून पुढे त्यांचा आध्यात्मिक प्रवास सुरू झाला. भानावर आल्यावर त्यांनी काही प्रश्न विचारले, कारण त्या देहातीत झाल्या होत्या. सर्वांसाठी असे अनुभव नवेच होते. पुढील काळात इतर अनेकांसारखेच त्यांचे नाव बदलले आणि रतनमोहिनी म्हणजेच जी इतर रत्नांना आकर्षित करते ती, असे ठेवण्यात आले. २००२ साली दिलेल्या एका मुलाखतीत दादीजींनी सांगितले होते- माझ्या कुटुंबातील लोकांनी सुरुवातीला या मार्गावर चालण्यास

विरोध केला; पण काळ बदलत गेला आणि हळूहळू विरोधही मावळत गेला. राधा-कृष्णाच्या भक्तीत रमलेल्या दादीजी आता ध्यान धारणेत रमू लागल्या. शाळेत जाण्यापूर्वी भक्ती करत. आता त्या ध्यान धारणा शिकवणाऱ्या शाळेच्या विद्यार्थिनी झाल्या आणि त्यांचा प्रमुख शिक्षक साक्षात शिव परमेश्वर होता. त्यांनी आपले जीवन शिवपित्याला समर्पित केले. ईश्वरी ज्ञानाविषयी त्यांची ओढ दिवसेंदिवस वाढतच गेली आणि ती अखेरच्या श्वासापर्यंत अबाधित राहिली. बाबा दादीजींना कौतुकाने म्हणत, बच्ची तू तर रत्नांची खाणच आहेस'. बाबांच्या महावाक्यांची टिपणे मोठ्या कौशल्याने दादीजी काढत आणि त्यावर सखोल चिंतन करत.

**जीवन प्रवास**

भारत पाकिस्तान फाळणीनंतर १९५० मध्ये संस्था भारतात आली. सर्व यज्ञ वत्स आबूत येऊन स्थिरावले. त्यापूर्वी १४ वर्षे त्या सर्वांनी कराची आणि सिंध हैदराबादेत गहन तप करण्यात घालवली होती. आता त्यातून झालेल्या प्राप्तीचा इतरांना अनुभव करविण्याची वेळ आली होती. ईश्वरी ज्ञान प्रसारासाठी बाबांनी सर्वांना ठिकठिकाणी पाठवले. १९५४ मध्ये जपानमध्ये भरलेल्या विश्वशांती संमेलनात बाबांनी प्रकाशमणी दादी आणि रतनमोहिनीदादी या द्वयीला प्रथम देशाबाहेर सेवेकरिता पाठविले. परतीच्या प्रवासात त्या हाँगकाँग, मलेशिया, सिंगापूर अशा काही देशात ईश्वरी सेवा करून परत आल्या. १९५६ ते १९६९ या दरम्यान त्या भारतात अनेक ठिकाणी गेल्या. रायबागान, कोलकाता, मुंबई अशा अनेक ठिकाणी त्यांनी सेवा केली. अनेकांना ईश्वरी ज्ञान-योगाची शिकवण दिली. अनेक मनुष्यात्म्यांच्या आध्यात्मिकतेची ज्योत जागृत केली. एक प्रकारे परिव्राजक साधकाचे जीवन त्या जगात होत्या. ब्रह्माबाबा अव्यक्त झाल्यानंतर विदेशात सेवाकेंद्र उघडण्याविषयीची कल्पना साकार करण्याचा आग्रह जगदीशभाईंनी धरला. सर्वानुमते असे ठरले, दादी रतनमोहिनी ही जबाबदारी पेलतील. १९७२-१९७४ दादीजी लंडनला राहिल्या. विदेश सेवेच्या पायाभरणीत त्यांचे असे योगदान घडले. सेवेतील इतर टप्पे सांगायचे झाले तर काही खालीलप्रमाणे मांडता येतील.

- राजयोग शिक्षण आणि संशोधन संस्थेच्या युवा विभागाचे अध्यक्ष.
- ब्रह्माकुमारी मुख्यालय, माउंट आबूकडे कर्मचाऱ्यांच्या विभागाची डायरेक्टर.
- राजस्थान झोनमधील ब्रह्माकुमारींच्या सेवा केंद्रांची झोनल प्रमुख.
- भारतातील शिक्षक प्रशिक्षण (टीचर्स ट्रेनिंग)ची डायरेक्टर.
- १९८५-भारत एकता युवा पदयात्रेचे आयोजन - याचे उदघाटन तत्कालीन राष्ट्रपती ज्ञानी झैलसिंग यांनी केले होते. ६५० पदयात्रींनी १२,५५० किमी. अंतर पादाक्रांत केले.
- १९८९ - मेटॅडोर रॅली. सातशेहून अधिक ब्र.कु. भाऊ-बहिणी यात समाविष्ट होत्या. त्यांनी एक लाखाहून अधिक लोकांना नशामुक्तीचा संदेश दिला.
- १९९४ मध्ये दादीजी अमेरिका, स्पेन इत्यादी देशात सेवेनिमित्त भ्रमण करून आल्या. पुढील काळात आफ्रिका खंडातील देश, ब्राझील, तसेच रशिया इत्यादी अनेक ठिकाणी त्यांनी भ्रमण करून हजारोंना ईश्वरी संदेश दिला.

दादी गुलजार ११ मार्च, २०२१ रोजी अव्यक्त झाल्यानंतर, समितीने त्यांना मुख्य प्रशासक म्हणून नियुक्त केले होते. तिथून पुढल्या काळात अखेरच्या श्वासापर्यंत त्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या प्रमुख प्रशासक म्हणून कार्यरत होत्या.

**वेचक अनुभव**

मोठा कार्यभार सांभाळताना व्यक्तिगत साधना आणि इतरांशी असलेली वागणूक यावरूनच माणसाची खरी ओळख होते. साधकाचा इतरांशी व्यवहार कसा होता यावरून त्याची साधना किती प्रखर आहे ते ठरविता येते. कृतीतून गुण झळकतात. दादीजींच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करायचे झाल्यास खालीलप्रमाणे काही गोष्टी मांडता येतील.

- एक गहन विचारवंत
- आध्यात्मिक विषयाबाबत कुशल वक्ता
- नेहमी हसतमुख
- दादी पवित्रतेचा, शांतीचा एक आदर्श होत्या.
- दादीजींना अनेकांनी एक आदर्श ब्रह्माकुमारी म्हणून पाहिले आहे.

लंडनस्थित ब्र. कु. गोपिबेन सांगतात, दादीजी म्हणजे आध्यत्मिक शास्त्रज्ञ होत्या. ईश्वरी ज्ञानाच्या सखोलतेकडे त्यांचा अधिक ओढा होता. अनेकांनी त्यांना अतिशय नेमस्त

(पृष्ठ क्र. १४ वर)

# दिव्यत्वाची जेथ प्रचीती

**ब्र.कु. सुदेश, जर्मनी**

मातेश्वरी जगदंबा यांच्या सोबत व्यतीत केलेल्या काही क्षणांच्या स्मृती आपल्यासमोर ठेवत आहे. एखादी व्यक्ती किती वेळा किंवा किती काळ आपल्या सान्निध्यात आली यापेक्षाही त्या व्यक्तीने आपल्यावर किती अमीट छाप उमटवली याला अधिक महत्त्व आहे असे मला वाटते. मातेश्वरींना सगळेजण प्रेमाने 'मम्मा' म्हणत तोच उल्लेख मी करत आहे. माझ्या बालपणीच्या ठळक स्मृतींनुसार मम्मांची खंबीर नेतृत्व दर्शवणारी मूर्त आजही डोळ्यासमोर उभी राहते. शिवपित्याने आरंभलेल्या ज्ञानयज्ञाच्या मम्मा 'यज्ञमाता' होत्या. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिव्यत्व होतं. त्या दिव्यत्वात एक आध्यात्मिक पोक्तपणा आणि सभ्यता होती. त्या पोक्तपणात स्नेहही होता आणि गांभीर्यदेखील सामावलेलं होतं. अशा गंभीर व्यक्तिमत्त्वात आत्मिक स्नेह, सुहास्य आणि सर्वांचे चरित्र निर्माण करण्याची शुभ भावना ओतप्रोत भरलेली होती.

**मुख्य विश्वस्त**

मातेश्वरी केवळ १८ वर्षांच्या होत्या; पण त्यांचे दिव्यत्व अर्थात स्वच्छ बुद्धीवर साक्षात शिवपिताही लुब्ध होते असे म्हणायचा मोह होतो. म्हणूनच जेव्हा ब्रह्माबाबांनी आपली सर्व संपत्ती माता-भगिनींच्या विश्वस्त मंडळाकडे सुपूर्त करायचे ठरविले तेव्हा त्याचे प्रमुखपद मम्मांकडे सोपवले. शिवपित्याने हा असाधारण विश्वास दर्शविला होता. कार्यभार शिरी धारण करूनही त्याचे ओझे होऊ दिले नाही हेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य. ना अहंकार ना तणाव. सदैव म्हणत 'हुक्मी हुकूम चला रहा है' म्हणजेच करविता धनी करत आहे. मुख्य विश्वस्त या नात्याने फार मोठा भार त्यांच्यावर आहे



असे कधी कुणाला जाणवत नसे. त्यांना सरस्वती म्हणजेच विद्येची देवी म्हटले जाई ते यथार्थ होते. ज्ञानमुरली बाबा ऐकवत; पण त्याचे सुलभ विश्लेषण मम्मा ऐकवत तेव्हा वाटे जणू सागरातील हिरे-माणीक-मोती आमच्यासमोर आणून ठेवलेत. त्यांची अमृतवचने म्हणजे हिऱ्यांचा हार गुंफून ठेवावा तसे भासे.

**आईसमान गांभीर्याची शिकवण**

जसं मोठ्या वयात प्रवेश करताना आई आपल्यातील अल्लडपणा काढून टाकायला मदत करते तसे मम्मांचे वागणे होते. चालता-फिरता सहजच ज्ञानरूपी धन त्यांच्या मुखातून बरसत असे. व्यक्तिमत्त्व शांत आणि गंभीर होते; पण त्याला कायम स्मितहास्याची लकेर असायची. त्यात दिव्यत्व असे. त्यांना उच्चारवात बोलताना कधीच कुणी पाहिलं वा ऐकलं नाही. एखाद्या देवीप्रमाणे त्यांचे रूप भासे. आम्ही कन्या एखाद्या गोष्टीवर खळाळून हसत असू परंतु त्या केवळ स्मितहास्यानेच प्रतिसाद देत. आमच्यात नि त्यांच्या वयाचे अंतर काही फार मोठे नव्हते; पण समजूतदारपणात त्या आमच्या पुढे अनेक योजनं गेल्या होत्या. जीवनात गांभीर्य काय असावे याचे त्या प्रत्यक्ष उदाहरण होत्या. गांभीर्य म्हणजे अंतर्मुखता किंवा ध्येयप्राप्तीसाठी सदैव अग्रेसर; पण याचा अर्थ त्यांचे जीवन शुष्क नव्हते. त्यांच्या स्नेहाच्या ओलाव्यात प्रत्येकजण न्हाऊन निघे आणि त्या स्नेहात शक्तीही होते. केवळ ममतामय व्यवहार नसे, लायक बनविण्याचे सामर्थ्य त्यात होते आणि तेच अलौकिक होते.

**निर्भयतेची किरीटकुंडले**

जिथे पावित्र्य आहे तिथे निर्भयतेचा गुण आहे. मम्मा शक्तीस्वरूप होत्या. भयाचा लवलेशही त्यांच्यात नसे. नेहमी निर्भयपणे सत्य मांडत; पण त्याचबरोबर सभ्यता सोडत नसत. सर्वसाधारण मनुष्य आपला मुद्दा आग्रही भूमिकेतून मांडताना आवेशात येतो, प्रसंगी क्रोधवशही होतो मात्र मम्मा कधीही तशा दिसून आल्या नाहीत. सदैव एखाद्या दीपस्तंभासमान निश्चल, अढळ होत्या. १९३७ च्या सुमारास ज्ञानयज्ञाचा आरंभच मुळी सनसनाटी झाला. गृहस्थाश्रमात राहून पवित्रतेचे व्रतपालन ही मोठी क्रांतिकारी घटना होती. न्यायालयात निर्भीडपणे संस्थेची बाजू मांडताना त्यांचे ते प्रखर सूर्यासमान सत्य रूप सर्वांनी पाहिले. सत्य ज्ञानाला विरोध करणारे अनेकजण होते. कुणी अपमानजनक शब्दही वापरत मात्र मातेश्वरींची मानसिक अवस्था निश्चल असे. गीतेत वर्णन केलेले 'स्थितप्रज्ञ साधकाचे' वर्णन त्यांना तंतोतंत लागू होत असे. गीतेतल्या दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञ काय असतो असे आम्हाला कुणी विचारले असते, तर आम्ही स्वाभाविकपणे मम्मांकडे बोट दाखवावे इतके ते सुस्पष्ट होते. एखाद्याच्या कुत्सित बोलण्यावर आम्हाला वाटे, ह्याला सणसणीत उत्तर द्यावे आणि त्याचवेळेस मम्मांचे बोलणे ऐकले, तर वाटे जणू शीतलवाहिनी गंगाच आपल्यासमोर उभी ठाकली आहे. त्या जळात कोणतीही खळबळ नाही, कचरा नाही, पाणी जणू इतकं नितळ की माणसाला त्याचं खरं रूप (विकाराधीन) दिसावं. कटू वचन जणूकाही फुले बनून गंगेच्या प्रवाहात पुढे निघून गेली असे भासे. त्यांनी कधीही कुठल्याही गोष्टी मनांत धरून ठेवल्या नाहीत. त्यांच्याकडे पाहताना हंसवाहिनी सरस्वतीचे मानवी रूप प्रकट होई.

**दृढता**

स्वमान अर्थात उच्च आत्मिक भानात स्थित होणे हा राजयोग साधनेतील एक भाग आहे. मम्मा या साधनेत अतिशय पारंगत होत्या. एका बँकेत काम करणारे भ्राताजी नियमित ईश्वरी ज्ञान ऐकायला येत. त्यांची पत्नी मात्र जरा खाष्ट स्वभावाची होती. एक दिवस मातेश्वरी ज्ञानवर्ग घेत होत्या आणि खाष्ट पत्नी आली. तिच्या मनांत या मार्गाविषयी बरंच काही उलट–सुलट होतं. तिने वर्ग चालू असताना अचानक घुसून अपमानजनक बोल बोलायला सुरुवात केली. मम्मांनी तिचे सगळे म्हणणे अतिशय शांतपणे ऐकून घेतले आणि नंतर वर्ग पुन्हा चालू केला. जणू काही घडलेच नाही. झाल्या प्रसंगाचे कुठलेही पडसाद ना त्यांच्या चेहऱ्यावर ना वाणीत. त्या कमळाप्रमाणे अलिप्त होत्या. नुकतीच झालेली चिखलफेक त्यांना स्पर्श करू शकत नव्हती. ती स्त्री निघून गेली आणि वाटले मम्मा ध्रुवताऱ्याप्रमाणे अढळ होत्या. त्यांचे डोळे, मुख, मन सगळेच कमळाप्रमाणे होते जणू. लक्ष्मीची पाऊले कमल दलावर दाखवतात तसे त्यांचे स्वरूप दिसून येई. लक्ष्मीच्या हातात शस्त्र नाही, तर ज्ञानरत्नांचा घडा आहे, वरदायिनी हात कायम आशीर्वाद देत आहे.

**माझ्या आध्यात्मिक माता**

आम्हा मुलांना मातेश्वरी अतिशय प्रेमपूर्वक शिकवत. त्या एकदा दिल्लीला आल्या होत्या. त्यादरम्यान जगदीशभाईंनी 'भगवान की सच्ची गीता' हे पुस्तक छापण्यापूर्वी मम्मांकडे तपासायला दिले होते. हिंदीतील ते पुस्तक त्यांना वाचून दाखविण्याची कामगिरी मला मिळाली होती. कॉलेजातून सरळ सेंटरवर मी जात असे. ऐकताना त्या अतिशय एकाग्र होऊन ऐकत आणि काही बदल सुचवायचा असेल तर एक क्षण थांबून मुद्दा लिहून घेत असत. प्रत्यक्ष मुद्द्यावर सखोल विचार करत. अशा प्रकारे त्यांना जवळून पाहता आले. त्याची छाप कायमस्वरूपी माझ्या चित्तावर उमटली आहे. म्हणूनच म्हणावेसे वाटते, त्या माझी आध्यात्मिक आईच होत्या. मला त्यांनी सभेत बोलायलाही शिकवले. जसे लहान बाळास आई–वडील बोलायला शिकवतात तसे मला आध्यात्मिक ज्ञान द्यायला त्यांनी शिकवले. त्याचे असे झाले ! एकदा एका ठिकाणी जाऊन क्लास कर असे त्यांनी मला सुचवले. मी बुजले आणि म्हणाले, मम्मा मी कशी बोलणार तिथे जाऊन? त्यावर त्या म्हणाल्या, अगं तू तर मला 'गीतेवरचे पुस्तक नाही का वाचून दाखवलेस! मी हो म्हटले. मग त्यातल्या गोष्टी, मुद्दे तर तुला कळले आहेत ना? मी मान डोलावली. बस्स मग तेच मुद्दे आज भाषणात वापरायचे आहेत. त्यांच्या अशा प्रोत्साहनामुळे मी तिथे गेले आणि माझी वाणी मोकळी झाली. तिथून पुढे मला जणूकाही एक वरदानच मिळाले.

**समर्पित कुमारीचा बहुमान**

मातेश्वरींनी आम्हा काही कन्यांचे एक संघटन तयार केले होते. एकदा त्या आमच्यामध्ये बसल्या असताना म्हणाल्या, ''कालीमातेवर

(पृष्ठ क्र. ११ वर)



# चिरतरुण दादींचे अव्यक्तारोहण !

**ब्र.कु. हेमंत, शांतिवन**

तो अविस्मरणीय शुभदिन होता– 'मंगळवार दिनांक २५ मार्च २०२५!' सुंदर फुलांनी सजलेला अन् आकर्षक श्रृंगाराने नटलेला विशाल डायमंड हॉल आतुर होता– प्राणांहून प्रिय, युवा हृदय सम्राज्ञी, दादी रतन मोहिनीजींचा १०१ वा जन्मदिन साजरा होणार होता...! आनंदाचे डोही आनंद तरंग असे अवर्णनीय वातावरण होते. इकडे–तिकडे चोहिकडे पावनतेचा परिमळ दरवळत होता... रंगबेरंगी फुलांनी सजलेल्या बग्गीत आरुढ होऊन दादींनी शांतीवन परिसराची परिक्रमा पूर्ण केली! दादींचं सभागारात शुभागमन झालं अन् श्वेतवस्त्रधारी होली हंसांनी फरिश्ता स्वरुप दादींवर पुष्पवर्षा केली, सहृदय स्वागत केलं, मंगल गीत गायन केलं, सुरेख नृत्यं केली, शुभकामनांचे हिरे–मोती उधळत गायन केलं, 'तुम जीयो हजारों साल, साल के दिन हो पचास हजार!'

पण कुणाला ठाऊक होतं, तपस्वीमूर्त दादी रतनमोहिनीजींचा हा अंतिम जन्मोत्सव ठरेल? अचानक दादींची तब्येत बिघडली, म्हणून दादींना आधी ट्रॉमा सेंटरमधे व नंतर अहमदाबादच्या हॉस्पिटल मधे नेलं. मग जे झालं, ते न मनी, न ध्यानी होतं! ८ एप्रिल २०२५ रोजी ब्राह्ममुहूर्ती प्रातः १.१० वाजता दादींनी नश्वर देहाचा त्याग केला. शब्द स्तब्ध झाले, लाखों युवांमधे नवचेतना भरुन, १०१ वर्षाच्या असूनही तारुण्याचं दर्शन करविणाऱ्या, आनंदी जीवनाचे शंभर वसंत पाहणाऱ्या, युवकांच्या 'युवा दादी' अव्यक्त लोकी निघून गेल्या. 'चिरतरुण' दादींच्या अव्यक्तारोहणा– सोबतच आदिरत्नांची ओममण्डळी ते आबू पर्यंतची अध्यात्म यात्रा समाप्त झाली. आत्मिक यात्रेच्या मार्गदर्शिका होत्या मातेश्वरी जगदम्बा सरस्वती, तर आता गार्ड बनल्या रतनमोहिनी दादीजी! आणि आदिरत्नांच्या मालिकेतील, यज्ञ इतिहासाच्या ईश्वरी सेवा यात्रेच्या आदि ते अंता पर्यंतच्या एकमात्र साक्षी बनल्या रत्नप्रभा रतनमोहिनी दादीजी!'

राजयोगिनी रतनमोहिनी दादींच्या सानिध्याचं सौभाग्य मज आत्म्यासही लाभलं. हे प्रभुचं वरदानच होतं, जे मधुबनच्या बागेत माझं पाऊल पडताच, दादींनी आत्मिक माळी बनून माझ्या जीवन वाटिकेला दिव्यगुणांच्या सुवासाने सुगंधित केलं, तेव्हा वय कमी होतं, जगही पाहिलं नव्हतं, ग्रॅजुएशन पूर्ण करुन मी मधुबन आलो होतो, मातेश्वरी भवन मधे सेवा मिळाली होती. मधुबनमधे मोठ्या जनसमुदायामधे राहणं तसं सोपं नव्हतं, बऱ्याच गोष्टींना तोंड द्यावं लागे. भोजनानंतर शांतिस्तंभ व इंद्रप्रस्थच्या प्रांगणात माझं बोट धरुन दादी शतपावली करताना त्या माझी प्रत्येक गोष्ट ऐकत व मोठ्यात मोठ्या गोष्टी छोट्या करत व मनावरचं ओझं कमी करुन हल्कं करत. दादी कधी माता बनून प्रेम करत, तर कधी पित्या प्रमाणे जीवापाड लाड करत, कधी शिक्षक बनून शिकवण देऊन सजवत, तर कधी सख्यासम संवाद साधून, हृदयाच्या वेदनेवर जणू औषध देत. खरच, 'ते दिवस किती गोड होते, दादीजी अमुच्या सोबत होत्या.' मज बालकावर दादीजी निःस्वार्थ प्रेमाची वर्षा करत. जणू सर्व संबंधांचे सॅक्रिन शिवबाबांच्या प्रेमात रमलेलं हृदय गातं,'माझे बाबाच माझे विश्व आहे!' असंच दादींच्या स्नेह–संपन्न स्मृतिंमधे हरवलेलं माझं बालमन ही गातं,'माझ्या दादींच माझे जग आहे!'

म्हटलं जातं–जीवन एक संघर्ष आहे! माझ्याही जीवनातला तो कठीण संघर्ष काल होता, माझ्या तना–मनाच्या आरोग्याची कठोर अग्नि परीक्षा होत होती, दादींनी हिमालयासम खंबीरपणे पाठीशी उभं राहून, छत्रछाया बनून साथ दिली. तेव्हा मला हृदयापासून जाणीव झाली. ज्ञान व योगाच्या कमतरतेमुळेच कुमार जीवनात वादळं येतात. मी दादींना

म्हणालो, 'दादीजी, कुमारांना ज्ञानबल व योगबलाने सशक्त केलं तर कुमार कमाल करतील, मला कुमारांच्या सेवेचा शुभसंकल्प येतोय' दादींनी माझी शुभभावना समजून, मला तत्काल युवा प्रभागाचा सदस्य बनवलं. ज्ञान सरोवर मधे प्रत्येक वर्षी २५ ते ३१ डिसेंबर पर्यंत बी.के. युवांच्या उन्नतीसाठी रिट्रीट होत असते, त्यात फक्त शंभर देशांचे, फक्त शंभर बी.के. युवा प्रतिनिधीच भाग घेतात व ट्रेनिंग झाल्यावर स्वदेशी जाऊन ते बी.के. कुमार व कुमारींना रिट्रीट (योगतपस्या) करवतात. त्या रिट्रीट मधे भाग घ्यायची माझी शुभेच्छा मी दादींकडे व्यक्त केली, दादींनी ऑस्ट्रेलियाचे ली भाई व लंडनच्या गोपी बहन कडून माझ्यासाठी खास परवानगी घेतली. दादींच्या आशीर्वादांमुळे शंभर युवा लीडर्समधे ट्रेनिंग घेण्याची मला सुवर्ण संधी मिळाली, फलस्वरुप दादींच्या प्रोत्साहनांमुळेच नेपाळ व भारतात जवळ-जवळ १७५ ठिकाणी बी.के. कुमारांकरीता सेल्फ रियलाईजेशन रिट्रीट करायचे सौभाग्य मला लाभले.

दादींच्या प्रेरणेने आम्ही बी.के. कॉलोनीतील कुमारांच्या स्वउन्नतीसाठी ग्रुप बनवला होता. आम्ही प्रकाशमणि पार्क मधे कुमारांसाठी रचनात्मक योगाचे प्रयोग करायचो, तर कधी अव्यक्त मुरलीं वर आधारित परीक्षा घ्यायचो, दादी स्वतः पेपर चेक करुन मार्गदर्शन करत. तर कधी दादी प्रकाशमणी पार्क मधे स्वतः येऊन कुमारांना योग करवत. प्रत्येक कुमाराला दादी पॉवरफूल दृष्टी देत व शक्ति भरत. प्रत्येकाशी संवाद साधून उमंग-उत्साहाचे पंख देऊन, त्यांना उन्नतीच्या आकाशात ऊंच भरारी देत. एकदा आम्ही पीस पार्क मधे कुमारांची रिट्रीट केली. असूयेपोटी एका निमित्त भावाने दादींकडे माझ्याविषयी तक्रार केली. दादींनी त्यांची समजूत काढत म्हटलं, 'हेमंत, मला विचारुनच कोणतीही सेवा करतो, मी नाही म्हणाले, तर तो ते करत नाही, बालक काही करु इच्छितो तर त्याला करु दे व त्याला पुढे जाऊ दे.' त्या वेळी माझा चेहरा थोडा खिन्न झाला होता, दादी माझं लक्ष वेधून म्हणाल्या, 'हेमंत, ज्ञान तर खूप छान देतो, आता चेहरा ही ठीक कर.' दादी स्नेहही देत अन् शक्तिही भरत. दादी लव एण्ड लॉ (प्रेम व कायदा) चे संतुलन साधून, कुमारांना स्व-परिवर्तन करायची प्रेरणा देत.

दादींच्या मागदर्शनामुळे आम्ही आबूरोडच्या शाळांमधे 'टच द लाईट' प्रोजेक्ट राबवला. त्यात ७वी, ८वी व ९वी इयत्तेतील विद्यार्थ्यांना आठवड्यातून एकदा मूल्यनिष्ठ शिक्षा दिली जाई. प्रोजेक्ट संचालन हेतू शांतिवनची मोठी टीम होती. सेवेत खूप अडचणी येत, तेव्हा मी टीमला दादींशी भेटवायचो, तेव्हा दादी सहजपणे समस्यांचं समाधान करत. संघटनात जो पुढे जातो, त्याच्यावर बहुदा टीका होतेच. ह्या संदर्भात एकदा टच द लाईट टीमला दादींशी भेटवत असताना, दादी माझ्याकडे इशारा करत म्हणाल्या, 'हेमंतबद्दल कुणी काहीही म्हणो, तो कुणाकडे लक्ष न देता, सेवा करत राहतो व प्रगती करतोय.' मग दादी माझ्याकडे पाहून मंद-मंद हंसत म्हणाल्या, 'मी पण असंच करते.' दादींचं हे सर्टीफिकेट मिळाल्याने माझा मन मोर आनंदाने नर्तन करु लागला. युवा प्रभागाने आयोजित केलेल्या स्वर्णिम भारत युवा पदयात्रेत, दादींनी मला आगरा ते जयपुर युवा पदयात्रेचा कोर्डिनेटर (समन्वयक) बनवलं. असंच सोलापूर मधे भारत युवा महोत्सवच्या आयोजनासाठी कित्येकदा मला सोलापूरला पाठवलं. दादी युवा महोत्सवाच्या उद्घाटनासाठी सोलापूरला गेल्या, तेव्हा मलाही दादीं सोबत सोलापूर सबजोनची टूअर करुन, सेवा करायची स्वर्णिम संधी लाभली. दादींच्या सहवासामधे राहून मी विशाल समुदायामधे रहायची कला शिकलो.

सहनशीलतेच्या मूर्ती दादीजी तर 'शिव-शिल्पकाराने' घडवलेल्या अनुपम 'दिव्य-शिल्प' होत्या! ईश्वरी संविधान व दैवी विधी-विधानाच्या ज्ञाता दादींनी शिल्पकार बनून, शिकवणुकीच्या छिन्नी व कायद्याच्या हातोड्याने अनेक दिव्यमूर्ती घडवल्या. दादींच जीवन तर अध्यात्माचं एक खुलं पुस्तक होतं! कठीण वाटणारे आध्यात्मिक ज्ञान सखोलपणे समजून, दादी कुशलतेने अध्यात्म आचरणात आणत. प्रातःकाली जागण्या पासून ते रात्री झोपेपर्यंत, दादी एक कठोर साधक बनून इंद्रियांवर नियंत्रण साधून असत. दादींचं आध्यात्मिक विद्यार्थी जीवन सर्वांसाठी आदर्श होतं, त्यांच्या ईश्वरी महावाक्यांचे पठन-अध्यापन व श्रवण -वर्णन इत्यादीचा नित्यक्रम सूर्यासमान अटळ होता. नियम-संयम व अनुशासन तर दादींच्या आदर्श विद्यार्थी जीवनाचा श्रृंगार होते. श्रेष्ठ कर्मांद्वारे प्रेरणा देणाऱ्या दादी खरे तर दिव्यगुणांचा दिव्यदर्पणच होत्या! प्रसिद्धीपराङ्मुख दादींचा त्याग गुप्त व खूप महान होता. अखंड प्रज्वलित ज्योति समान प्रभू प्रियतमच्या आठवणीत सदैव मग्न राहणाऱ्या

(पृष्ठ क्र. १४ वर)



# 'लाईट हाउस' - सेंट पीटर्सबर्ग रशिया

**भावानुवाद : ब्र.कु. मिनल, ठाणे (प.)**

नमस्कार, ओम शांती. मी 'लाइट हाउस' बोलतोय. समुद्रातील जहाजांना मार्गदर्शन करणारे नव्हे, तर या कलियुगी भवसागरात विषयविकारांच्या अंधारात भरकटलेल्या माणसांना योग्य मार्ग दाखवणारा ब्रह्माकुमारीज संस्थेचा दीपस्तंभ आहे मी. रशियातील नव्हा नदीच्या काठावर वसलेल्या सेंट पीटर्सबर्ग शहरात माझं वास्तव्य आहे. आज मी तुम्हाला माझी कहाणी सांगणार आहे.

गोष्ट सुरू होते १९८९ च्या सुमारास. ज्यावेळी सोव्हिएत संघात राजकीय घडामोडींना वेग आला होता. समाजवादी विचारसरणी अनुसरणाऱ्या एका महाशक्तीचे अनेक देशांमध्ये विघटन होऊ घातले होते. काय होणार, कसे होणार या विचारांनी लोक भांबावून गेले होते. प्रामुख्याने ख्रिश्चन धर्माचे, रुढीवादी असले तरी येथील लोकांमध्ये भारताची प्राचीन संस्कृती जाणून घेण्याची ओढ होती. तिकडे दिल्लीत शक्तीनगर सेवाकेंद्राचे नियमित विद्यार्थी असलेल्या बी.के. विजय भाईंना ओशनॉलॉजी विषयातील पुढील शिक्षणासाठी सोव्हिएत युनियनकडून आमंत्रण आले. ईश्वरी ज्ञान, योग, शुद्ध भोजन इ. श्रीमताचे काटेकोर पालन करणाऱ्या विजय भाईंना तेथील लोक राजयोगाबद्दल विचारत असत. सेंट पीटर्सबर्ग येथे ईश्वरी सेवेचा आरंभ होण्याची हीच योग्य वेळ होती. थोडीफार रशियन भाषा अवगत असलेल्या संतोष दीदींच्या माध्यमातून सेवा सुरू झाली.

एका हॉलमध्ये लोक राजयोगाविषयी जाणून घेण्यासाठी येत असत. दीदी इंग्लिशमधे बोलत, एक रशियन व्यक्ती त्याचे भाषांतर करत असे. कम्युनिस्ट देशात देवाविषयी बोलताना सावधानता बाळगावी लागे. त्यामुळे शुभचिंतक 'गॉड' म्हणण्याऐवजी त्यांनी 'सुप्रीम सोल' हा शब्द उच्चारला. आश्चर्य म्हणजे त्या भाषांतरकाराने रशिन भाषेत 'बोग' म्हणजेच ईश्वर असा सरळ अनुवाद केला. वरवर पाहता राजकीय व्यवस्था काहीही असो पण आत्म्याच्या अंतर्मनातील परमात्म्याचा सुखद अनुभव कुणीही काढून टाकू शकत नाही याविषयी संतोष दीदींची खात्री पटली. बोलणं संपल्यावर त्यांनी राजयोगाचा अभ्यास करवला. उपस्थितांना एक मिनिट शांतीच्या अनुभूतीने खूपच प्रभावित केले. दुसऱ्या दिवशीच्या सत्रात हीच मंडळी चातक होऊन ऐकत राहिली. भाषांतर करून किती करणार? शेवटी एकेकाला बोलावून प्रसाद दिला तेव्हा त्यांचे नेत्र सजल झाले होते. कुणी म्हणे तुम्ही माझ्या स्वप्नात आला होता तर कुणी सांगे सिस्टर स्टेजवर तुम्ही नव्हताच, तिथे तर केवळ प्रकाशच प्रकाश होता. या अद्भूत अनुभवामुळे कित्येकांनी देश न बदलता स्वतःला बदलण्याचा (स्वपरिवर्तन) निर्णय केला. भाषणाचे तीन दिवस झाले. आपण इंग्लिशमधे बोललेले सगळेच रशियन भाषेत सांगण्यात कमी पडतंय की काय असे वाटून दादींनी विचारले, ''तुम्ही काय ऐकलेत?'' त्यावर हॉलमधील सर्व मंडळी उठून उभी राहिली. टाळ्या वाजवू लागली. ''काय समजले?'' या प्रश्नावर एकमुखाने उत्तरली 'या दुशा' 'मी आत्मा आहे' वाह! परमात्मा शिवबाबा वाह! बुद्धिवंतांना बुद्धी देणाऱ्या बाबांनी त्यांच्या बुद्धिमधे सत्य ज्ञान रुजविले.

आता इथे कोर्स सुरु ठेवण्याचे ठरल्यावर चक्रधारी दीदी व विजय भाईंनी एक फ्लॅट भाड्याने घेण्याचे निश्चित केले. एक महिना झाल्यावर भाडेकरार वाढवण्याचे ठरले असता चौथ्या दिवशीच मालकाने फ्लॅट रिकामा करण्यास सांगितले. नव्या शहरात नुकतीच सेवा सुरू झालेली, आता काय करायचे? चक्रधारी दीदींनाही सांगण्यात आले. जोवर राहण्याची चांगली व्यवस्था होत नाही तोपर्यंत संतोष दीदींनी मॉस्कोला परत

यावे असे त्यांचे मत होते. मात्र कितीही कष्ट पडले, बिकट परिस्थिती आली तरी इथे सेंटर उघडायचेच असा संतोष दीदींचा निर्धार कायम होता. उद्यापासून क्लास होणार नाही असे संध्याकाळी क्लासमधे सांगितल्यावर एकदम शांतता पसरली. क्लास सुरू ठेवण्याबद्दल उपस्थित लोकांचे एकमत होते. अशात एक माता (ब्र.कु. नतालिया - सेंट पीटर्सबर्ग प्रथम राजयोग बॅचची विद्यार्थीनी - मे १९९०) पुढे आली व तिने दीदींना १ महिन्यासाठी स्वतःच्या घरी येण्याचे आमंत्रण दिले. त्या काळात ती मैत्रिणीकडे राहणार होती.

एक-दोन महिने म्हणता म्हणता वर्ष पूर्ण झाले. एकदा मुरलीमधे बाबांचे महावाक्य आले त्याचा भावार्थ होता 'मुलांनो तुम्ही शहराच्या मेयरकडे जायला हवं. त्यांना सांगावं, विश्वात सुख शांती स्थापन करण्यासाठी सर्वांना राजयोगाचे शिक्षण निःशुल्क दिले जाते. त्यासाठी निश्चित स्थान असेल तर चांगली सेवा घडेल. तेव्हा स्थान तुमचे व सेवा आमची.' नव्यानेच कोर्स झालेली एक बहीण प्रथमच मुरली ऐकत होती. तिला काय वाटले कुणास ठाऊक, वरील महावाक्य ऐकून ती उभी राहिली व तडक मेयरच्या ऑफिसमधे पोचली. ''आमची बहीण सिस्टर संतोष भारतातून आल्या आहेत व त्यांना राजयोग शिकवण्यासाठी घर हवे आहे'' तिने मेयरला सांगितले. समाजवादी व्यवस्थेत अशाप्रकारे कोणी थेट बोलू शकते हे आश्चर्यच होते. तिने परत येऊन सांगितले की दीदी तुम्हाला उद्या व्यवस्थापन कार्यालयात बोलावले आहे. त्या देशात आध्यात्मिक कार्य करणाऱ्यांना शिक्षा होऊ शकते असे ऐकिवात होते. नवीनच सेवा सुरु झालेली, आता काय करायचे; पण जायला तर हवे होते.

दुसऱ्या दिवशी दीदी ऑफिसमधे पोहोचल्या तर डेप्युटी हेड साहेब व आणखी सहा जण बसलेले. त्यांच्या हातात डायरी, पेन होते. म्हणू लागले तुमच्या इथून काल कोणीतरी आलं होतं, सांगा तुम्हाला काय काय हवं आहे? कुठलाही संशय नाही की प्रश्न नाहीत. ही निव्वळ शिवबाबांची कमाल होती. निर्भय होऊन दीदी सांगू लागल्या, ''संध्याकाळी ज्या हॉलमध्ये आम्ही सेवा करण्यास जातो तिथे सकाळी डिस्कोथेक चालतो. त्यामुळे राजयोगाचा अभ्यास सुरु करण्याआधी तिथे पडलेला सिगारेट, दारूचा कचरा स्वच्छ करावा लागतो. वातावरण शुद्ध करण्यात आमचा पुष्कळ वेळ वाया जातो. त्यामुळे आम्हाला संस्थेसाठी एक घर हवे आहे.'' सगळी मंडळी लक्षपूर्वक ऐकत होती.

विचार विनिमय करून डेप्युटी हेड साहेब म्हणाले, ''सध्या नवीन नियम बनत आहेत. समाजवादी विचार सरणीप्रमाणे आम्ही तुम्हाला मालकी हक्क असणारे घर नाही देऊ शकणार; पण आताच्या तुमच्या हॉलपासून २ मिनिटांवर जमिनीचा मोकळा प्लॉट आहे, तो देता येईल. त्यावर तुम्हाला हवे तसे बांधकाम करून घ्या.'' पूर्वकल्पातील नोंद प्रत्यक्षात साकार होताना दिसत होती. यानंतर एका आठवड्यातच मेयरची स्वाक्षरी होऊन एक एकर जमीनीचा कागद ब्रह्माकुमारीजच्या नावाने दीदींच्या हाती आला. गुलजार दादीजी, जगदीश भाईजींकडे तो कागद पाठविण्यात आला. आदरणीय गुलजार दादीजींच्या माध्यमातून ऑलमाइटी बाबांनी यापुढे काय करावं, कसं करावं याविषयी सुंदर मार्गदर्शन केले. मिळालेल्या जमिनीच्या अर्ध्या भागात बांधकाम करून उर्वरित भाग पार्कसाठी मोकळाच ठेवावा असे बाबांनी सांगितले होते.

वाचकहो, आता माझ्या (लाईट हाऊस) बांधकामास खऱ्या अर्थाने सुरुवात होणार होती. त्यासुमारास दादी जानकी तिथे आल्या. प्रचंड थंडीत स्वेटर, कोट, टोपी, गरम कपड्यांचे थर अंगावर चढवून ३०० हून अधिक ब्र.कु. भाऊ बहीणी क्लासमधे हजर होते. जागा तर मिळाली; पण बांधकामासाठी आर्थिक पाठबळ हवे होते. दीदींनी सर्वांचे कौतुक केले. ''तुमच्या ज्ञान, योगाच्या तपस्येनेच हे स्थान मिळाले आहे. अच्छा, या क्लासमधे कोणी इंजिनिअर आहेत का? त्यांना सगळा आराखडा समजावून सेवा सुरू करता येईल.'' मेकॅनिकल, सिव्हिल इंजिनिअर इ. ७० जण उभे राहिले. दादी म्हणाल्या, ''संतोष, ये तो बना ही पडा है. तुम्ही सगळे बनवणार ना?'' यावर सगळ्यांनी टाळ्या वाजवून ईश्वरी सेवेचा विडा उचलला.

मग काय शिवबाबांची भण्डारी भरपूर होत राहिली. एकदा भण्डारीच्या पेटीत दादींना छोटीशी पुडी सापडली. उघडली तर त्यात आणखी एक, आत अजून एक अशा चार पुड्या उघडल्यावर आत सोन्याचा दात होता. चिठ्ठीवर लिहिले होते, 'बाबांच्या घरासाठी' वाह बाबा! गरीबनिवाज बाबांच्या अशा निरागस मुलांच्या योगदानामुळे एक दिमाखदार वास्तू उभी राहिली. प्रत्येक वर्षी कोणी ना

(पृष्ठ क्र. २४ वर)



# देवाशी संवाद

ब्र.कु. मधुरा, ठाणे

आपण पुराणात किंवा प्राचीन कथेत वाचले आहे, काही महात्मे किंवा संत मंडळी देवाशी संवाद साधायचे. एवढेच नव्हे तर देवापाशी हट्ट धरायचे किंवा चक्क त्याच्याशी भांडायचे! बहुतेकदा आपल्याला ह्या काल्पनिक कथा वाटतात किंवा काहीतरी अद्‌भुत आहे असा समज होतो. या विचारगुंत्यातून हे सगळे कागदावर उतरावल्याशिवाय राहवेना म्हणून हा लेखनप्रपंच.

जरा विचार करा देवाशी असा संवाद साधणे खरंच शक्य आहे का? कुठल्याही संवादात दोन व्यक्ती गुंतलेल्या असतात. किंवा असे म्हणू या दोन व्यक्ति संवाद साधत असतात. एकाने विचार मांडला की दुसरा त्याला प्रतिसाद देतो. आपण ऐकलेल्या गोष्टींमध्ये 'एकनाथ','नामदेव', 'तुकाराम' इ. संत मंडळी पांडुरंगाच्या मूर्तीशी बोलत आहेत असे चित्र चितारले आहे. पण खरंच का हो मूर्तीशी बोलणे शक्य आहे? संत नामदेवांचे फार प्रसिद्ध उदाहरण आहे. नामदेवांनी नैवेद्याची खीर नेली की ती खीर प्रत्यक्ष भगवंत खायचे असे वर्णन आढळते. गोंदवलेकर महाराज श्रीक्षेत्र गोंदवले सोडून जाणार म्हटल्यावर साक्षात श्रीरामाच्या मूर्तीच्या डोळ्यांनाही धारा लागल्याचे आपण वाचतो. काय असेल हा अनुभव? आपल्यालाही देव असा भेटू शकतो का?

तर्कनिष्ठ विचार केला तर मनुष्याचे एखाद्या मूर्तीशी बोलणे शक्य नाही; पण मथितार्थात आपण गेलो तर हा संवाद खरे तर एका मनाने दुसऱ्या मनाशी केलेला असू शकतो काय? असे तर नव्हे की हा 'आत्म्याने परमात्म्याशी केलेला संवाद असेल!'

आपल्या शास्त्र पुराणात 'देव' ही संकल्पना एखाद्या अतिमानवी शक्तीप्रमाणे रेखाटली जाते किंवा त्याला दगडाच्या मूर्तीत सिमीत केले जाते. आणि त्यामुळे एखाद्या मनुष्याचा देवाशी संवाद ही कल्पना आपल्याला पचत नाही.

आता आधुनिक विज्ञानाने टेलीपथी म्हणजेच दूरवर बसलेल्या व्यक्तिशी विचारांची देवाण घेवाण मान्य केली आहे. जर दोन वेगवेगळ्या देशात असलेल्या व्यक्ती एकमेकांशी मनाने संवाद साधू शकतात, तर मग आपण एखाद्या दिव्य शक्ति संपन्न आत्म्याशी असा संवाद का नाही साधू शकणार? हो! पण त्यासाठी आवश्यकता आहे ती शक्तिशाली सकारात्मक संकल्पांची, मनाच्या पावित्र्याची आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्याच्याशी संवाद साधायचा आहे त्या दैवी/परम आत्म्याच्या परिचयाची.

तर देवाशी संवाद साधायची आपली इच्छा आहे का? हा प्रश्न प्रत्येकानी स्वतःला विचारायला हवा. आपण बहुतेकदा देवाकडे काहीतरी मागणे मागत असतो किंवा आपले गाऱ्हाणे सांगत असतो. पण इथे प्रश्न येतो देवाशी किंवा परमात्म्याशी आपले नाते जुळले आहे का? आणि नाते जुळायला आपल्याला त्याचा यथार्थ परिचय आहे का ? एखाद्या नवीन नात्याची सुरुवात होते तेव्हा प्रथम आपली त्या व्यक्तीशी ओळख होते. मग त्याचाशी नियमितपणे भेटी-गाठी, बोलणे होते आणि अशा प्रकारे ते नाते दृढ होत जाते. पण आपली देवाशी ओळख झाली आहे का? त्याही आधी एक प्रश्न- आपली स्वतःशी ओळख आहे का? 'मी कोण आहे' ह्या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर आपल्या मिळाले आहे का? असे म्हणतात मी कोण? ह्या प्रश्नाचे उत्तर मिळाले तर आयुष्यातल्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील. बहुतांश लोक ह्या प्रश्नाचे उत्तर मी एक गृहिणी, नोकरदार माणूस, व्यावसायिक इ. आहे असेच देतील. आणि स्वतःला शरीर समजल्यामुळे आपण स्वतःचा असा परिचय देतो. आपल्यातले गुण-अवगुण आपण देवालाही चिकटवू पाहतो. उदाहरणार्थ शंकरालाही राग आला, लक्ष्मी रूसून निघून गेली इ.

देवालाही साकार शरीररूपी प्रतिमेत अडकवले आहे.

आपण स्वतःला मनुष्यात्मा म्हणवतो म्हणजेच – मी मनुष्याचे शरीर धारण करणारा एक बिंदू स्वरूप आत्मा हीच माझी खरी ओळख आहे. त्याचप्रमाणे श्रीराम, श्रीकृष्ण, श्रीविठ्ठल हे सर्व दैवी शक्ति असलेले दिव्यआत्मे किंवा देवता आहेत. पण त्यांचेही मूळ स्वरूप बिंदू स्वरूपच आहे ! मात्र ज्यांना जन्म आहे त्यांचा देहत्यागही अपरिहार्य आहे. एकच परमशक्ती आहे, ती मात्र जन्म-मृत्यूच्या चक्रातूनही मुक्त आहे, तिचे नाव –शिव

शिव, परमशक्तीने संपन्न आहे, तो परमात्मा आहे बाकी कुणी धर्मात्मे असतील, देवात्मे किंवा महात्मे असतीलही; पण परमात्मा किंवा ईश्वर एकच! मग आता त्याचे स्वरूप कसे असेल बरे? तोही ज्योती बिंदू स्वरूपच असला तरी तो परमशक्तींचा सागर आहे. तर अशा ह्या परमात्म्याशी संवाद साधणे ह्यालाच आपण 'राजयोग' असे म्हणतो. योग ह्याचा अर्थ जुळणे. वर उल्लेख केल्याप्रमाणे शिव पिता जन्म-मृत्यूच्या चक्रापासून अलिप्त आहे, त्यामुळे त्याला सृष्टीवर अवतार घ्यावा लागतो म्हणजेच साधारण मनुष्य शरीराचा आधार घ्यावा लागतो. ज्यांच्या द्वारे हे कार्य करवितो त्यांचे 'प्रजापिता ब्रह्मा' असे नामकरण करतो. जेव्हा आपला परमात्म्याशी परिचय होतो तेव्हा त्याचाशी संवाद साधणे किंवा दुसऱ्या शब्दात योग जुळणे हे सहज शक्य होते. आपण एका उदहारणाद्वारे हे समजून घेऊया-

आपण जेव्हा रेडिओ ऐकतो तेव्हा त्याची वेगवेगळी स्टेशन्स असतात जसे विविध भारती, ९३.५ एफ. एम. इ. आपल्याला जे गाणे ऐकायचे असेल त्या ध्वनिलहरींशी आपण आपला रेडिओ जुळवतो. अशाच प्रकारे जर आपल्याला परमात्म्याशी संपर्क साधायचा असेल तर आपल्याला त्याच्या दिव्य लहरींशी तादात्म्य पावावे लागेल!

मंडळी, जरा विचार करा त्या सर्वशक्तिमान परमेश्वराशी बोलायला काय मज्जा येईल हो! हा जीवलग सखा आपल्यासाठी नेहमीच उपलब्ध असतो. तो कधीही रुसत, चिडत, रागवत नाही. आणि मुख्य म्हणजे कुठल्याही परिस्थितीत तो आपली साथ सोडत नाही.

मग वाट कसली बघताय? त्या तिन्ही जगाच्या स्वामीशी ओळख करून घ्यायला आणि त्याचाशी नातं जोडून राजयोग शिकायला लवकरात लवकर तुमच्या जवळच्या सेवाकेंद्राशी संपर्क साधा !

***

---

(पृष्ठ क्र. ५ वरून)

समर्पित कोण होऊ इच्छितो?'' मी पटकन उठले आणि त्यांच्या जवळ गेले. त्यांनी माझा हात पकडला आणि मी संपूर्णपणे देहातीत झाले. मला माझ्या शरीराचे भानच उरले नाही ना त्यांच्या देहाचे. त्यांनी मला जवळ घेतले आणि मी अनुभवत होते हा माझा नवा जन्म आहे. (विकारांची वसने) जुन्याचे जुनेपण गळून पडले. त्यांनी उच्चारलेल्या शब्दांचा भावार्थ होता – जग ज्या मरणाला घाबरते त्या मरणातून आम्हास परमानंदाची प्राप्ती होते. 'जिस मरने से जग डरे, मेरे मन आनंद, मरनेही ते पाईये पूर्ण परमानंद' मला जेव्हा सेंटरवर पाठवायचे होते तेव्हा त्यांनीच माझ्या वडिलांना सांगितले, ''ही आता सेंटरवर राहायला जाईल.'' माझ्या मावशीने राजयोग सेंटर उघडले होते तिचे स्वास्थ्य ठीक नव्हते त्यामुळे माझ्या वडिलांनी मला तिथे जाण्यास अनुमती दिली. १९५८ मध्ये त्या जेव्हा दिल्लीत आल्या होत्या, तेव्हा माझ्या वडिलांनी मला विधिवत ज्ञानयज्ञात समर्पित केले. संस्था भारतात आल्यानंतर अशाप्रकारे समर्पित होणारी मी प्रथम कन्या. आजही या सर्व आठवणी मला रोमांचित करतात आणि सदोदित शक्ती भरत राहतात. अशा स्मृती प्रेरणास्रोत आहेत. त्यांच्याविषयी म्हणावेसे वाटते – **दिव्यत्वाची जेथ प्रचीती तेथे कर माझे जुळती.**

***

---

## सुविचार

* चांगली पुस्तके एका जादूच्या चटईसमान असतात. जी आपल्याला हळूहळू त्या जगाचा प्रवास करवतात. जिथे आपण दुसऱ्या कुठल्याच माध्यमाद्वारे पोहचू शकत नाही.
* स्वच्छ स्पर्धा आरोग्यपूर्ण आयुष्याचे चिन्ह आहे, पण द्वेष मात्र भयंकर आजार आहे.
* अती विचाराने ही कधी मन अशांत होते. काही वेळेस त्या त्या परिस्थितीत तसे तसे शुभ संकल्प करून बाबांवर (ईश्वरावर) सगळे सोडून मोकळे व्हायचे असते.



# कर्महिशेब आणि वैश्विक नाटक

ब्र.कु. रमेश रेडिओ, मधुबन शांतिवन, आबू

एकदा काही लोक अजमेरहून रेडिओ मधुबनला भेट द्यायला म्हणून आले होते. त्यात एक पोलीस इन्स्पेक्टर होते. त्यांच्याबरोबर त्यांचे कुटुंबीय देखील आले होते. आल्यावर थोडी विचारपूस केली त्यांची. ते म्हणाले, 'खूप मजेत आहे. एकदा मी इथे येऊन गेलोय. फार छान वाटले म्हणून आता माझ्या कुटुंबालाही घेऊन आलोय. त्यांची पत्नी, मुलगा, मुलगी सर्व होते. बोलता बोलता मी त्यांना सहजच म्हटले की तुमचा मुलगा शिकत आहे, हे शिक्षण या जन्मात घेतलेले, ते पूर्ण झाले की त्यानंतर नोकरी लागते. नोकरी करत करत आयुष्य पूरे झाले, वय झाले की एक दिवस मृत्यूही येतो. मृत्युनंतर पुन्हा तेच चक्र चालू होते, कुठे न कुठे त्या आत्म्याचा जन्म होतो. खरे की नाही? ती लोकं म्हणाली, 'हो नं अगदी खरयं!' मी पुढे म्हटले, 'ह्या दुसऱ्या जन्मानंतर परत तेच शिक्षण घ्या, परीक्षा द्या, पास व्हा, नोकरी करा. जर एखादा शिक्षण नको म्हटला तरी आई वडील त्याला शाळेत घालणारच, त्यांच्या इच्छेखातर तरी मुलाला शिकावेच लागेल. पण इथे मी तुम्हाला एक गुह्य रहस्य सांगू इच्छितो की त्या सर्वशक्तीवान परमात्म्याने आपल्यात एक सुंदर software टाकले आहे, ते म्हणजे आत्मा एक शरीर सोडून जेव्हा दुसऱ्यात प्रवेश करतो, तेव्हा मागील जन्माचे सर्व काही आपोआपच पुसले (delete) जाते. त्यामुळे आत्म्याला पूर्व जन्मीचे काहीच आठवणीत राहत नाही. जर आठवण राहिली, तर ते जन्मलेले बाळ आपल्या पूर्वजन्मीच्या नातेवाईकांच्या शोधात राहील आणि नात्यांमध्ये बराच गुंता निर्माण होईल. ज्या घरात जन्म घेतला त्या आई-वडिलांना, भावा-बहिणींना तो मुलगा/मुलगी आपले मानूच शकणार नाही. त्यांना ही किती दुःख, यातना होतील ह्या सर्व प्रकारात! ह्यासाठीच ईश्वराने तशी योजना केली आहे की आत्मा एक शरीर सोडून जेव्हा दुसऱ्या गर्भात प्रवेश करतो, तेव्हा मागील जन्मातील गोष्टी आधीच पुसल्या जातात. मग म्हणूनच तो नव्या जन्माचा नव्या नात्यांचा आनंद घेऊ शकतो. आपल्या नव्या आई-वडिलांना आपले मानून त्यांनी दिलेले संस्कार धारण करतो. पुन्हा शिक्षण, परीक्षा, नोकरी, लग्न, म्हातारपण हे चक्र सुरूच राहते.

दुसरे म्हणजे कधी कधी आपल्याला वाटते अमुक गोष्ट माझ्याच बाबतीत का घडते आहे? मलाच एवढे दुःख अशांती का मिळते? मी ह्याच कुटुंबात का बरे जन्म घेतलाय? मी जर एखाद्या गडगंज कुटुंबात जन्म घेतला असता, तर लहाणपणापासूनच मलाही खूप धन प्राप्त झाले असते. विनाकारण आता ह्या घरात आलोय तर मला मेहनती शिवाय पर्यायच नाही. असे प्रत्येकालाच वाटते की माझा जन्म इथेच का झाला? कारण आपल्याला कर्मांचा हिशोब पूर्ण करावाच लागतो. ह्यात तुमच्या कर्माचे खाते नष्ट होत नाही. फक्त ती स्मृती (memory) विसरली जाते. म्हणूनच जिथे तुमच्या कर्माचा हिशोब असेल. तिथेच तुम्हाला जन्म घ्यावा लागतो. माझ्या ह्या सांगण्यावर सर्व लोकांना खूप बरे वाटले आणि ते सोप्या भाषेत (सामान्यांना कळेल अशा आणि आजच्या संगणकीय भाषेत) सांगितल्याने त्यांना ते पटलेही.

पुढे मी म्हटलं, 'जर मी तुम्हाला अजून एक जादूची गोष्ट (magic) सांगितली तर! ऐका हे- तुम्ही जे ह्या जन्मात शिक्षण घेता ते इथे याच जन्मात कामी येते. दुसऱ्या जन्मात ते बरोबर येत नाही. हे मी तुम्हाला उदाहरणासहित सांगितलेलेच आहे. पण जन्मोजन्मी आत्म्याबरोबर जाईल अशा शिक्षणाबद्दल सांगितले तर आवडेल का तुम्हाला? आणि यातही आश्चर्य म्हणजे तुमचे कार्मिक अकाउंटही इथे याच जन्मात साफ

(पृष्ठ क्र. २४ वर)



# “बाबांकडून नवजीवन मिळाले”

**ब्र.कु. अनंत, नडियाद (गुजरात)**

मी स्वत:ला अती भाग्यवान समजतो, कारण सेवाकेन्द्राच्या बाजूलाच बाबांनी मला घर शोधून दिले आहे. २००८ ची गोष्ट. नडियादचे रावजी भाई मला त्यांच्या दुचाकीवर बसवून रात्रीच्या (जवळ जवळ) ८ वाजता हथनोली पाठशाळेत मुरली क्लास करायला घेऊन जात होते. इतक्यात समोरून एक कार भरधाव वेगात आली. आम्ही टक्कर होऊन पडलो. मी दुचाकीच्या मागच्या सीटवर होतो – टक्कर इतकी जोरात बसली होती, की मी उडून कारच्या काचेवर आपटलो... डोक्याला जबर मार बसला आणि माझी शुद्धच हरपली. दोन ठिकाणी हाड तुटले (Frature) रावजी भाईंनाही फ्रॅक्चर झाले पण ते शुद्धीत होते. मग घटनास्थळी कुणीतरी ॲम्ब्युलन्सला बोलावून आम्हाला इस्पितळात नेले. ह्या सर्व घटनाक्रमात नडियाद आणि अहमदाबाद सेवा केन्द्राच्या दैवी परिवाराची फार-फार मदत मिळाली. सर्वांचे मी त्यांच्या-त्यांच्या नावासहित आभार मानतो÷मी जवळ-जवळ १२ दिवस होतो इस्पितळात. घरी येऊनही साधारण ३-४ महिने संपूर्ण आराम करावा लागलो, तेव्हा कुठे मी चालता-फिरता झालो. अशावेळी लौकिक परिवाराने, नातेवाईकांनीही खूप मदत केली. माझी पत्नी आशाच्या सेवेचे तर फारच मोठे योगदान म्हणावे लागेल. बाबांच्या ज्ञानामुळे, योगसाधनेमुळे अशा कठीण प्रसंगी तिचे मानसिक धैर्य खच्ची झाले नाही. सेवाकेंद्र घराच्या जवळच असल्याने बराच फायदा झाला – तसा मी सेवाकेन्द्राच्या मदतीचा गेली १० वर्षे वेळोवेळी अनुभव घेतच आहे. परंतु ह्या कठीण प्रसंगातही ते एवढ्या मदतीला धावतील याची कल्पनाही केली नव्हती. बाबांची छत्रछाया आणि परिवाराची मदत – खरंच भाग्य असावे लागते यासाठी !

ज्या रात्री अपघात झाला आणि आम्ही इस्पितळात पोहोचलो, त्याच्या दुसऱ्या दिवशी आदरणीय पौर्णिमा दीदींनी नडियाद सेवाकेन्द्र आणि सबझोन च्या साऱ्या सेवाकेन्द्रास योग करावयास सांगितले. यामुळे 'दवा के साथ दुआ' म्हणतात ना, सर्वांच्या योगाच्या शुभ भावनांनी मी लवकर बरा झालो. हा फारच सुखद अनुभव होता. ह्याच काळात ब्र.कु. रश्मी भाईंनी (Power of subconcious mind) अंतर्मनाची शक्ती' हे पुस्तक वाचायला दिले. बाबांचे ज्ञान-योग आणि ह्या पुस्तकात सांगितलेल्या गोष्टींचा प्रयोग करत राहिलो. असे (अंतर्मनाचे + ज्ञान + योग) प्रयोग स्पार्क मध्येही करतात. त्यामुळेच मी मनाने एकदम मजबूत राहिलो आणि लवकरच पूर्णपणे बराही झालो.

मला त्या काळात रात्री ५-६ वेळा लघवीला जावे लागे, काठीच्या आधाराने मी जायचो. खूप त्रास व्हायचा. शिवाय रात्रीची झोपही मोडायची. फॅमिली डॉक्टर म्हणाले, तुम्ही किडनी हॉस्पिटलमध्ये तपासून घ्यावे. मी जरा उदास झालो. काय करावे सुचेना, म्हटले आता हे काय नवीन? मग मी बाबांना अमृतवेळेला अगदी मनापासून आळवले. म्हटले बाबा, आता परत वेगळ्या दवाखान्यात, एक नवीन दुखणे घेऊन. मला तर स्वत:ला जाताही येणार नाही, कुणाला नेऊ आता सोबतीला? शिवाय आधीच येवढा खर्च त्यात अजून भर! बाबा, तुम्ही तर सुप्रीम सर्जन आहात. मग मला ही बरं करा ना! (असे म्हणता-म्हणता माझे डोळे भरून आले.) पण चमत्कारच झाला म्हणायचा त्या दिवसापासून ते दुखणे कमी-कमी होत होत ४-५ दिवसांतच मी पूर्ण बरा झालो.

एवढ्या मोठ्या अपघातानंतरही शरीराच्या कुठल्याही अंगाला काहीच दुखापत झाली नाही, त्यासाठी बाबांचे जितके आभार मानू कमीच पडेल. काही भाऊ, बहिणींनी आणि गीता

पाठशाळेच्या गरीब मातांनी आर्थिक मदतीचा हात पुढे केला. ''पैशांची अडचण असेल तर नक्की सांगा भाऊ.' (पण बाबांनी अशी वेळच येऊ दिली नाही) काही ब्र.कु. बहिणींनी अमृतवेळेच्या योगात मला बापदादांच्या कुशीत (मांडीवर) बसलेले बघितले. (बाबा माझ्यावर त्यांच्या शक्तिशाली किरणांचा वर्षाव करीत होते.) अशा गोष्टी त्यांनी ऐकवल्या की मला फार भरून येत असे. मला ज्यांनी मन्सा वाचा-कर्मणा मदत केली, त्यांचेही मी कोणत्या शब्दांत आभार मानू कळत नाही. मी सुद्धा त्या सर्वांना शिवबाबांद्वारे शुभ कामना पाठवत राहायचो. सर्वात जास्त आभार कुणाचे तर आपल्या सुप्रीम सर्जन, सुप्रीम हिलर शिवबाबांचे!

शेवटी मी इतकेच म्हणेन की, **'फानूस बनकर जिसकी हिफाजत हवा करें, वह शमा क्या बूझे, जिसको रोशन खुदा करें!'**

***

---

(पृष्ठ क्र. ३ वरून)

आणि निग्रही प्रशासक असे अनुभवले. अगदी वयाच्या ९०-९५ वर्षांपर्यंत त्या सकाळी चालत शांतिवनात पदयात्रा करताना रोज सगळे पाहत असत. त्या यात्रेतही त्या कामासंबंधी काही बोलत, कुणाला स्मितहास्य देऊन पुढे जात, कुणाची चौकशी करत. त्यांच्या विचारशक्तीत अचूकपणा होता. त्यांनी आपल्या विचारशक्तीवर प्रभुत्व मिळवले होते. दादीजी जेव्हा युरोपात गेल्या तेव्हा गोपिबेन अनेक ठिकाणी त्यांच्यासोबत भाषांतर करण्याच्या निमित्ताने वावरल्या एकदा असे झाले.- युरोपातील युवा मंडळींचे एक योगशिबिर होते. त्यात दादीजींनी सर्वांकडून राजयोग साधनेचे प्रात्यक्षिक करून घेतले. काही विचार मांडत गेल्या आणि राजयोगाचा अभ्यास करवून घेताना अनेकांनी गहन शांतीचा तिथल्या तिथे अनुभव घेतला. मात्र एक बहीण म्हणाली, दादी आत्ता तुमच्या समोर आम्ही हा अनुभव घेतला; पण घरी गेल्यावर काय? असे म्हणताच त्यांनी पुन्हा साधनेला बसायचा इशारा केला. पुन्हा तसाच सुंदर अनुभव अनेकांनी केला. त्यानंतर त्या बहिणीने पुन्हा तेच पालुपद लावलं. तिसऱ्यांदा दादीजी योग करवून घ्यायला बसल्या. लोकांना पुन्हा गहन शांतता लाभली; पण त्या बहिणीचे समाधान काही होईना. तेव्हा दादीजी तिला म्हणाल्या, भविष्यात काय होईल या विचाराने तुझे वर्तमान बिघडवू नकोस. आत्ता काय करायचे आहे त्यावर लक्ष एकाग्र कर, येणारा काळही त्याद्वारे बदलत जाईल. इतक्या संयमी, निग्रही आणि विचारांवर ताबा ठेवणाऱ्या होत्या दादीजी.

लंडनमधल्याच लीलाबेन नावाच्या एका मातेच्या घरी दादीजी गेल्या असताना त्यांनी जेवणाचा आग्रह केला. दादाजींनी तो प्रेमळ आग्रह स्वीकारला. मात्र त्यांचा आहार दीड पोळीचा होता, गोपिबेननी आग्रह केला म्हणून तेवढाच घेतला. त्या म्हणाल्या, मला माहीत आहे, माझ्या देहाला किती अन्न आवश्यक आहे. त्यापेक्षा जास्त खाल्ल्यास पोट बिघडेल मग मनही अस्वस्थ होईल आणि पुढचा प्रवासही. कुठे पूर्णविराम लावायचा हे त्यांना फारच चांगले अवगत होते आणि ते त्यांनी साधनेने मिळवले होते. असे अनेक अनुभव त्यांच्या संपर्कात आलेल्यांनी घेतले. मोठी माणसे म्हणजे नदीच्या प्रवाहासारखी असतात. वाटेत येणारा खड्डा आपल्या पाण्याने भरतात आणि मगच पुढे जातात, इतर प्रवाह आपल्या सोबत घेत घेत सागराला जाऊन मिळतात. दादाजींनी तसेच करत ८ एप्रिल २०२५ रोजी पहाटे १:२० रोजी आपला नश्वर देह त्यागला आणि शिवपित्याच्या मंगल मिलनासाठी मार्गस्थ झाल्या. थोरा-मोठ्यांचे जीवन आपल्यासाठी कायमच प्रकाशदर्शक ठरते. अमृतकुंभतर्फे दादीजींना शतशः प्रणाम.

***

---

(पृष्ठ क्र. ७ वरून)

'प्रभुप्रियतमा दादींची' तपस्या अखण्ड होती, दादींनी केलेल्या दिवस-रात्र अथक सेवा तर अगणित आहेत! खरोखर, दादी रतनमोहिनीजी तर निरंतर त्याग, अखण्ड तपस्या व अथक सेवेच्या अतुलनीय उदाहरण होत्या. अशा अतीप्रिय 'एवर युथ दादींना' आम्ही स्नेहपूर्ण सहृदय श्रद्धासुमन अर्पित करतो...

***

**सुविचार** ज्या दिवशी माणसाला समजेल की समोरचा चुकीचा नाही, तर फक्त त्याचे विचारच आपल्यापेक्षा वेगळे आहेत. त्या दिवशी अनेक वाद संपतील!



# आत्मा आणि शरीर दोन्हीस स्नान

ब्र.कु. बदलू, बासपदमका, गुरुग्राम हरियाणा

माझा जन्म १३ नोव्हेंबर १९५० साली एक शेतकरी कुटुंबात झाला. माझ्या जन्माच्या २ महिने आधीच वडिलांना देवाज्ञा झाली होती. आई आणि आजोबांनी माझे पालन-पोषण केले. मला ७ वी पर्यंत शिकवले. पण माझे लग्न मात्र त्यांना त्याकाळाप्रमाणे खूप लवकर म्हणजे माझ्या वयाच्या १२ व्या वर्षीच केले आणि त्यानंतर मला शेतकामात लावले. मला अनेक प्रकारच्या गोष्टींची जाण असल्याने (कथा माहीत होत्या) गावातील लोक मला 'महाशय' ह्या उपाधीने संबोधतात. जमीनदारीच्या कामात अती व्यग्र असल्याने मला आंघोळ (स्नान) करण्यास ही वेळ मिळत नसे आणि इच्छाही नसे, कारण जेव्हा-जेव्हा मी स्नान करायचो, हमखास आजारी पडायचो. असे नेहमीच व्हायला लागले. मग मी कंटाळून वर्षातून ३-४ वेळाच स्नान करायला लागलो. पुढे-पुढे तर पाण्याकडे नुसते बघितले, तरी अंगावर काटे यायचे. मग मी जेव्हा-जेव्हा मातीत काम करायचे, तेव्हा मात्र ओल्या कपड्याने शरीर स्वच्छ करायचो आणि कपडे बदलायचो. पण काहीही करून स्नान करणे मात्र टाळायचो.

२००५ची गोष्ट. आमच्या गावात ब्रह्माकुमार भाऊ-बहिणींचा एक गट आला होता. त्यांनी लावलेल्या प्रदर्शनी मेळ्यात सांगितले की, 'मी कोण आहे? कुठून आलो आहे? परमात्मा कोण आहे? 'तो' कुठे राहतो? पृथ्वीवर कधी येतो? - हे सर्व त्यांचे स्पष्टीकरण ऐकून मी चकितच झालो - वाटले खरंच हे भाऊ बहिणी समाज सुधारण्याचे काम चोख करतील की ! माझा प्रभावित झालेला चेहरा बघून ते मला म्हणाले, की ह्यात तुम्हाला रस असेल तर असे करा- आमच्या बहोडाकला केन्द्रात (ओमशांती रिट्रिट सेंटर) या आणि अनुभव घ्या.

मग एक दिवस मी सेवाकेन्द्रावर जायला निघालो - धारूहेडा वरून बिलासपूर चौक आणि तेथून सेवाकेन्द्र - सेवाकेन्द्राजवळ येताच मनात विचार आला, आज बाबांचे घर बघायचेच. मला वाटायला लागले - मला कुणीतरी बोलवत आहे. आपोआपच माझी पावले गेटकडे वळली. तिथे एक भाऊ उभा होता. त्याने मला पाहून विचारले, 'भाऊ कुठून आलात म्हणायचे?' मी गावाचे गाव सांगितले. तसे त्या भावाने दुसऱ्या भावाला बोलावून सगळे सेंटर फिरून मला दाखवले. ते सगळे पाहून मला सारखे हेच वाटत होते, की ही जागा माझ्यासाठी नवी नाही. बहुतेक मी इथे येऊन गेलोय.


काही दिवसांनी माझ्या गावात, माझ्याच घरात ज्ञान मुरलीचा क्लास सुरू झाला. त्यांनी मला हे ही सांगितले होते की बाबांचे मोठे घर माउंट आबू येथे आहे. आतापर्यंत मी ५ वेळा माउंट आबूला भेट देऊन आलो आहे. मी मागील १८ वर्षापासून ज्ञानात आहे आणि आता मात्र मी रोज स्नान करतोय. तनाचे आणि आत्म्याचेही. मी आरोग्यपूर्ण, सुखी जीवन जगतोय. सर्व दुःखे दूर झाली.

माझी सर्वांप्रति हीच भावना आहे की, ईश्वराचे बनून तर बघा, ईश्वरच तुमचा होऊन जाईल.

***

**आरोग्या करिता टीप**

कुकरमध्ये डाळी शिजवताना लगेचच शिट्टी लावू नये, आधी डाळीला थोडे उघड्यावर जास्तीचे पाणी टाकून शिजू द्यावे, त्यावर आलेल्या फेसाला (ऊत) पळीने बाजूला काढावे. कारण ह्याच ऊताने शरीरातील uric acid वाढते, ज्यामुळे joint pain होते. ऊत काढावे आणि डाळ जेव्हा अर्ध्याच्या वर शिजेल तेव्हा झाकण लावावे डाळ लगेच शिजते. अशा प्रकारे अन्न शिजताना हवा आणि सूर्यप्रकाश दोन्ही लागेल.



# सिस्टर मोनिका- कॅनडा, अनुभवाचे बोल

**मार्च २०२५ मधुबन भेटीमध्ये माऊंट आबूच्या ज्ञानसरोवरातील मुक्कामादरम्यान विदेशी बहीण 'सिस्टर मोनिका' ह्यांच्याशी अनुभवांची देवाण घेवाण करण्याची संधी मिळाली. त्याचाच हा सारांश.**

**व्यवसायाने शिल्पकार असलेल्या सिस्टर मोनिका ह्या सध्या काही महिने भारतातील उदयपूर येथे वास्तव्यास आहेत. लौकिक परिवारात सिस्टर मोनिका एकट्याच ज्ञानामार्गावर चालत आहेत. त्यांचा ३१ वर्षांचा ज्ञानातला प्रवास जितका छान आहे, त्याहूनही चित्तवेधक अनुभव त्यांच्या ज्ञानप्राप्तीचा आहे.**

तुम्ही ज्ञानात कशा आलात? असा प्रश्न त्यांना विचारला असता, त्यांनी अत्यंत रोचक असा अनुभव सांगितला. त्याचा भावानुवाद करण्याचा प्रयत्न मी इथे केला आहे.

मोनिका बहननी सांगायला सुरवात केली. माझा जन्म दक्षिण अमेरिकेमधील 'उरुग्वे' देशातला; पण माझा परिवार आणि मी १० वर्षांची असताना कॅनडाला स्थलांतरित झाला. १९९१ मध्ये मी आणि माझ्या जिवलग मैत्रिणीने उरुग्वे ते ब्राझीलच्या किनारपट्टीचा प्रवास करायचं ठरवलं. मी त्या वेळी २१ वर्षांची होते आणि टोरोंटोमध्ये ब्रँडिंग आणि डिझाईन क्षेत्रात काम करत होते. ह्या प्रवासाची योजना आम्ही खूप दिवसांपासून आखत होतो. आम्ही दोघीही नातेवाईकांना भेटायला आणि रोमांचक प्रवास अनुभवायला खूप खूप उत्सुक होतो.

प्रवासादरम्यान एका दुपारी मी आजीच्या खोलीत झोप घेत होते. तेव्हा अचानक मला कोणीतरी खोलीत उपस्थित असल्याची जाणीव झाली. मला वाटलं की गावात कुणाला तरी माझ्या येण्याची बातमी कळली असेल आणि ते भेटायला आले असतील; कारण आमच्या गावात अशी रीत होती. पण ती व्यक्ती मला ओळखीची वाटली नाही. ती व्यक्ती खोलीमधील कोपऱ्यात माझ्याकडे सहृदय प्रेमाने बघत उभी होती. उंच, डोक्यावर विरळ केस आणि पांढरी वस्त्र परिधान केलेले व्यक्तिमत्व होते. मला जाणीव झाली ही कोणी विशेष व्यक्ती आहे आणि मी लगेच उठून बसले. त्यांच्याभोवती अद्भुत शांततेचं तेजोवलय होतं. मला वाटलं ही व्यक्ती धर्मगुरू असावी; पण त्याचं रूप ख्रिस्तासारखं किंवा ख्रिस्ती धर्मातील आणखी कोणा धार्मिक व्यक्तीसारखं नव्हतं. मी विचार करणं थांबवलं आणि शांतपणे त्यांच्याकडे बघत राहिले.

ते मला म्हणाले अरुंद वळणदार रस्त्याने पर्वतावर जा, तिथे तुला परमात्मा भेटेल. मी तुझ्यासाठी खूप मोठ्या योजना आखल्या आहेत आणि क्षणातच ती व्यक्ती अदृश्य झाली. ह्या सर्व गोष्टींमुळे मी प्रभावित झाले होते आणि गोंधळूनही गेले होते. मी खोली बाहेर पळाले आणि त्यांना शोधू लागले. तिथे कोणीच नव्हते; माझ्या मनात प्रश्नांचे वादळ सुरु झाले. कोण होती ही व्यक्ती? खोलीत कधी आली? पर्वतावर परमात्मा भेटीचा संदेश देऊन अदृश्य झाली आणि कुठे गेली?

मी लगेच आजीला विचारलं जे वृद्ध गृहस्थ माझ्या खोलीत आले होते, ते कुठे गेले? मला त्यांच्याशी बोलायचंय. माझी त्यांच्याशी लहानपणीची काही ओळख आहे का? त्यावर आजी म्हणाली, कोण वृद्ध गृहस्थ? इथे तर कोणीच आलं नव्हतं. मी पार गोंधळून गेले होते आणि हृदय जोरात धडधडत होतं. मी ह्या अनुभवामुळे खूप प्रभावित झाले होते. मी लगेचच माझ्या जिवलग मैत्रिणीला

फोन केला आणि घडलेली घटना सांगितली. मग आम्ही कोणीतरी धार्मिक व्यक्तीशी ह्याविषयी चर्चा करायचं ठरवले. मी माझ्या चुलत बहिणीला फोन केला. ती म्हणाली की कदाचित तो येशू असेल आणि मला चर्चमध्ये जाऊन पाद्रींशी बोलायचा सल्ला दिला. मला चर्चमधे कधीच रुची नव्हती; पण मला पडलेल्या प्रश्नांची उत्तरं काही करून मिळवायचीच असा ध्यास असल्याने मी चर्चमधे जायला तयार झाले. पाद्री म्हणाले कधी कधी येशू वेगळ्या रूपातही येतो. पण जी शांतता मी त्या गूढ व्यक्तीच्या भेटीत अनुभवली होती ती मला चर्चमध्ये नाही जाणवली. यात चर्चचा अनादर करण्याचा माझा उद्देश नाही; पण माझा व्यक्तिगत अनुभव हा असा होता. चर्चमध्ये एक तासभर धार्मिक गायन ऐकल्यावर मला कळून चुकले की त्या घटनेचा चर्चशी संबंध नाही आणि मला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे चर्चमधे मिळणार नाहीत.

दुसऱ्या दिवशी आम्ही प्रवासाला निघालो; पण माझा प्रवासाचा बिलकुल मूड नव्हता. मी खूपच गोंधळून गेले होते आणि काहीतरी चुकल्या-चुकल्यासारखं वाटत होतं जणूकाही आमच्या प्रवासाचा प्रत्येक क्षण मी अलिप्त होऊन बघत होते. मी प्रवासातील मौजेचा उपभोग घेऊ शकत नव्हते कारण माझ्याबरोबर ज्या घटना घडल्या, त्यांची कारणे समजत नव्हती. त्या क्षणी माझ्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट फक्त एकच होती, की कोण होती ती व्यक्ती? आणि मला नक्की काय सांगत होती? माझं मन फक्त ह्या एकाच गोष्टीवर एकाग्र झालं होतं आणि त्या व्यक्तीला भेटायचा ध्यास लागला होता.

प्रवासाच्या तिसऱ्या दिवशी, माझ्या मैत्रिणीने एक स्वप्न पडले की मी पांढरी वस्त्र परिधान केली आहेत. पुढच्या रात्री तिने परत स्वप्नात पहिले की आम्ही दोघी एका पर्वतावर आहोत आणि आमच्यासारखेच इतर सर्व लोकांनीही पांढरी वस्त्र परिधान केली आहेत. त्याच्या पुढच्या रात्री तिने स्वप्नात पहिले की एका वृद्ध महिलेच्या शरीरात प्रकाश प्रवेश करत आहे. हे सर्वच आम्हा दोघींसाठी खूपच विचित्र होतं. आम्ही पार गोंधळून गेलो होतो. हे सर्व आमच्याबरोबर का होतंय हे कळत नव्हतं.

आमच्या सहलीच्या सातव्या दिवशी ब्राझीलमधील एका छोट्या बेटावर मी समुद्रकिनाऱ्यावर अलिप्तपणाच्या भावनेने चंद्राकडे पाहत बसले होते आणि मला असे जाणवले की एक व्यक्ती येऊन माझ्या शेजारी बसली आणि म्हणाली, तू प्रकाश आहेस आणि म्हणून तू अविनाशी आहेस. तिने नुकताच अर्जेंटिना देशात राजयोगाचा कोर्स केला होता. तिने सांगितलेली सर्व माहिती मला खूप आवडली.

कॅनडाला परतल्यानंतर मी राजयोग केंद्र शोधून तिथे गेले. जेव्हा दीदींनी दरवाजा उघडला, तेव्हा मला लगेचच शांतीची कंपनं जाणवली. अभ्यासक्रमातील पहिला दिवस संपल्यावर दीदींनी विचारलं चहा पिणार का? मी हो म्हणाले आणि वरच्या मजल्यावर जाताच, तिथे मला नारायणी नशेची अनुभूती देणारे ब्रह्मा बाबांचे दगडावरील आडवे झोपलेले छायाचित्र दिसले. मी थक्क झाले. मी ओळखते ह्यांना !!! ज्यांना मी माझ्या खोलीत पहिले होते त्यांचेच हे छायाचित्र होते... ज्यांनी मला पर्वतावर परमात्मा भेटीची आणि राजयोगाद्वारा प्रकाशाचा अभ्यासाची माहिती दिली होती !!! परम आनंदाच्या अनुभवाने अश्रू अनावर झाले.

मी दीदींना सांगितलं की तुम्हाला विश्वास नाही वाटणार पण ह्या छायाचित्रातली व्यक्ती उरुग्वेत माझ्या आजीच्या घरी आली होती. मी दीदींना विचारलं, कृपया माझी त्यांच्याशी भेट घडवून द्या. मला खूप प्रश्न आहेत आणि मी त्यांना व्यक्तिशः ओळखते. दीदींनी स्मितहास्य केलं आणि म्हणाल्या की ब्रह्मा बाबांनी १९६९ मध्ये देह सोडला. मी पुन्हा चक्रावून गेले. पण त्यावर त्यांनी सांगितलं की तू योगाद्वारे त्यांच्याशी संवाद साधू शकतेस. मग तर मी अजूनच गोंधळून गेले...

मी कोर्स पूर्ण केला आणि मला लवकरच मधुबनला जायची परवानगी मिळाली. माझ्या अंतःकरणात इच्छा होती की मी जिथे जिथे ब्रह्मा बाबा गेले, तिथे तिथे जावं - केवळ मधुबन नाही तर संपूर्ण भारतात !!!

मोनिकाबेनना ह्या ज्ञानातील संपूर्ण प्रवासात लौकिक परिवाराची कितपत साथ लाभली हे विचारले असता, त्या म्हणाल्या, माझे कुटुंबीय आणि मित्रपरिवार ह्यांनी आजतागायत माझ्या निर्णयांना कायमच पाठिंबा दिला. माझ्यातील बदललेल्या जीवनशैलीमुळे मला आणि इतरांना फायदा होतोय ह्याची त्यांना जाणीव होत होती. मी ब्रह्मा बाबांना भेटण्याच्या आधीपासूनच शुद्ध शाकाहारी होते.... आमच्या घरातील एकमेव शाकाहारी!! लहानपणापासूनच मला तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि आध्यात्मिक

अभ्यासात रस होता. १९ वर्षांची असताना मी श्रीमत् भगवद्गीता वाचली होती. माझी वृत्ती कधीच संकुचित नव्हती कारण मला कायम मानसशास्त्र आणि परिवर्तन ह्या विषयांमध्ये रुची होती. राजयोग हे मला मिळालेलं सर्वात शक्तिशाली साधन आहे असे मला वाटते.

पाश्चिमात्य देशांमध्ये दिले जाणारे राजयोगाचे ज्ञान भारतात दिल्या जाणाऱ्या ज्ञानापेक्षा वेगळे आहे का? आणि कसे ? हे विचारले असता, त्या म्हणाल्या, अमेरिकेत जसं ज्ञान दिलं जातं, ते भारतापेक्षा खूप वेगळं आहे. इथे आधी ध्यानावर लक्ष केंद्रित केलं जातं आणि सहा महिन्यांनंतर ब्रह्मचर्य व श्रीमताचा विषय येतो. इथे धर्मसंप्रदायांविषयी भीती असते, म्हणून आम्ही आत्मभान, परमात्मा आणि ध्यानावर लक्ष केंद्रित करतो. पाश्चिमात्य देशांमध्ये धार्मिक पंथांविषयी एक संवेदनशीलता आहे, कारण अनेक वेळा आध्यात्मिकता ही धार्मिक पद्धतीनेच पाळली जाते – नियम, न्याय, भीती आणि दुष्प्रवृत्ती यांवर भर दिला जातो. व्यक्तीने स्वतःच्या अंतरात्म्याकडे प्रामाणिकपणे पाहण्यासाठी जागरूकता आणि अंतर्मुख विश्लेषण विकसित करणं गरजेचं असतं, जेणेकरून आत खोलवर रुजलेला पितृसत्ताक विचारसरणीचा किंवा भक्तीचा अंश ओळखता येईल. हे फार सूक्ष्म आणि अंतर्गत विश्लेषण असतं.

राजयोग हा एक पवित्र, उन्नत आणि वैयक्तिक मार्ग आहे तो पूर्णत्त्वाकडे नेण्यासाठी आहे. जर राजयोगाची साधना धार्मिक भक्तीच्या पद्धतीने केली गेली, तर ती तुमच्या उपचार प्रक्रियेला, परिवर्तनाला आणि अंतर्मुख होऊन अंतरात्म्यातील प्रचंड शक्ती उघडण्याच्या क्षमतेला विलंब करते.

तुम्हाला राजयोगाचा वैयक्तिक जीवनात कसा फायदा झाला? आणि नवीन येणाऱ्या जिज्ञासूंना व राजयोगी विद्यार्थ्यांना तुम्ही काय सल्ला द्याल? हे विचारले असता, त्या म्हणाल्या, मला माझ्या आजवरच्या आध्यात्मिक प्रवासात काही महत्त्वाच्या गोष्टी जाणवल्या त्या अशा:

- प्रत्येकजण आपल्या घडणीनुसार / स्वभानुसार आध्यात्मिक जागृती अनुभवतो. आपले मूळ स्वरूप पुन्हा प्राप्त करण्यासाठी एकच मार्ग सगळ्यांसाठी योग्य ठरत नाही. त्यामुळे स्वतःला काय हवंय ते ओळखायला शिका, आणि जे तुमच्यासाठी योग्य आहे ते शोधा.
- राजयोग स्वतःला पूर्वग्रहांपासून मुक्त करण्यासाठी एक शक्तिशाली साधन आहे, आणि ही प्रक्रिया वेळ घेते. त्यामुळे संयम ठेवा. संयम आणि सातत्याने त्याचा अभ्यास करा.
- संपूर्ण जग अतिशय वेगाने बदलत आहे आणि आपल्याला अशा जगात जगायला शिकावं लागेल. जग एका मोठ्या संक्रमणातून जात आहे. यासाठी आपण स्वयंपूर्ण आणि अत्यंत लवचिक असणं आवश्यक आहे – आणि यासाठी धैर्य, प्रेम आणि अंतःशांतीची साधना लागते.
- तुमच्या खऱ्या, मूळस्वरूपाशी पुन्हा एकरूप होणे आणि बाबांशी जोडले जाणे हे नित्य अस्थिरतेचा सामना करण्यासाठीचं सर्वात शक्तिशाली साधन आहे.

आणखी एक अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपलं शारीरिक आरोग्य. आपल्याला परिवर्तनाच्या प्रक्रियेत आणि येणाऱ्या बदलांना सामोरे जाण्यासाठी शरीराची मदत आवश्यक आहे. **सेवेच्या नावाखाली या प्रक्रियेत शरीराकडे दुर्लक्ष करता येणार नाही.** ही जुनी विचारसरणी आहे, जी आपल्याला एक समुदाय म्हणून बदलावी लागेल जेणेकरून आपण अधिक निरोगी आणि संतुलित आध्यात्मिक शक्तीचे रूप जगासमोर साकार करू शकू. म्हणूनच आरोग्यदायी अन्न खा, व्यायाम करा आणि निसर्गात वेळ घालवा. आपल्या अंतःप्रेरणेशी जोडलेले राहा आणि तिच्यावर विश्वास ठेवा. शरीराची नैसर्गिक उपचारशक्ती पुन्हा जागृत करण्यासाठी शक्यतो नैसर्गिक औषधांचा वापर करा, जेणेकरून ते आत्म्याच्या प्रवासाला अधिक चांगल्या प्रकारे साथ देऊ शकेल. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. तुमची लवचिकता, बदलांशी जुळवून घेण्याची क्षमता आणि सर्व आध्यात्मिक शक्तींचं प्रकटीकरण हे आरोग्यपूर्ण शरीरावर अवलंबून आहे.

जेव्हा आत्मा आणि शरीर दोन्ही निरोगी असतात, आणि तुम्ही स्वतःच्या मूळ रूपाच्या जवळ जाता, तेव्हा तुम्ही तेजस्वी दिसता आणि आनंददायक, उच्च ऊर्जा तुमच्यातून झळकते. प्रयत्न न करता, सहजपणे संधींचे दरवाजे उघडू लागतात. तुम्ही आकर्षक बनता आणि सेवा तुमच्याकडे येते – तुम्हाला तिचा शोध

(पृष्ठ क्र. २० वर)

# परीकथा

(भाग २०)

## श्रीकृष्ण लवकरच येईल

**ब्र.कु. रेखा देगलूर**



राधा स्वप्नातल्या परीची गोष्ट सर्वांना सांगत होती आणि मी (श्यामा) खूप खुश होते. राधेकडे पाहिल्यावर मन कसं एकदम शांत होत होतं. या निरागस चेहऱ्याकडे बघतच राहावं असं वाटत होतं. ती मात्र साऱ्यांना परीची कथा सांगत होती. व तिला आपल्या जीवनाचं लक्ष्य तिच्या बालमनाच्या कुवतीनुसार समजत होतं. तिला मोठं होऊन काय बनायचं आहे ते ती इतरांना सांगते.

रोज बाबांनी मुरलीमध्ये तिच्यासाठी काय सांगितलं हे विचारते. त्याप्रमाणे वागायचा प्रयत्न करते. बाबांचे श्रीमत किंवा आज्ञा काय आहे ते रोज विचारते. हे सर्व पाहून आम्हा दोघांना खूप आनंद होतो. असेच सुट्ट्यांचे दिवस चालू आहेत, बाहेर खूप ऊन असल्यामुळे मुलं ओसरीत बसतात, खेळतात, गप्पागोष्टी करतात. रोजचा त्यांचा हा दिनक्रम चालत होता. असंच एकदा त्यांच्या गोष्टी खूप रंगल्या होत्या. टीव्हीवरच्या मालिकांचा विषय मुलांच्या गप्पात रंगला होता. ते सर्वजण श्रीकृष्णाच्या लहानपणीच्या गोष्टी एकमेकांना सांगत होते. श्रीकृष्णाने कालिया नागाला मारले ती कथा एकीनं सांगितली. भीमपराक्रम आणि बकासुराचा वध आणि गोवर्धन पर्वताची गोष्ट अशी प्रत्येकाने एक एक गोष्ट सांगितली. मग मात्र शेवटी साऱ्यांनी राधाला विचारलं, ''राधा आता तू एक गोष्ट सांग'' राधा म्हणाली, ''हो सांगेन ना पण साऱ्यांपेक्षा माझी मात्र गोष्ट खूप वेगळी आहे. परीच्या सांगण्यानुसार लवकरच श्रीकृष्ण सृष्टीवर अवतरित होईल. श्रीकृष्णाचा जन्म कसा होणार ते सांगणार आहे.'' लगेच राधाची मैत्रीण म्हणाली, ''तेच ना ग वसुदेव देवकीला कंसाने कारागृहामध्ये ठेवले होते. मग श्रीकृष्णाचा जन्म झाला.'' राधा म्हणाली, ''नाही ती गोष्ट नाही. पण आता लवकरच या धरतीवर श्रीकृष्ण व राधेचा जन्म होणार आहे.'' राधाच्या मैत्रिणी म्हणाल्या, ''कसं काय श्रीकृष्ण व राधेचा जन्म कसा होणार?'' राधा म्हणाली, ''हो! मला माझ्या परीने ही गोष्ट सांगितली खूप दिवसांनी मला माझ्या स्वप्नात परी आली व मला ही गोष्ट सांगितली.'' ''राधा लवकर सांग ना मला खूप उत्सुकता वाटत आहे ऐकण्याची.'' राधाची मैत्रीण राधाच्या जवळ जात म्हणाली. राधेने मग गोष्टीला सुरुवात केली.

''परी माझ्या स्वप्नात आली मला ती वर आकाशात खूपच उंच स्थानावर घेऊन गेली होती व एका विमानात बसून ती मला फिरवत होती. मला खूप मज्जा वाटत होती. नेहमीप्रमाणे परीने नवीन प्रकारचा गोड फळाचा रस आणला होता. व तो मी प्यायले. खूप खूप स्वादिष्ट होता.'' मग ती गोष्ट सांगण्यास सुरुवात केली म्हणाली, ''राधा बाळ या धरेवर लवकरच श्रीकृष्णाचा जन्म होणार आहे.'' मी म्हणाले, ''खरंच का गं ! जे मला पूर्वी माझी आजी गोष्टीत सांगायची. त्याचा जन्म तुरुंगात झाला. असेच खूप काही गोष्टी ती आम्हाला सांगायची.'' परी म्हणाली, ''हो पण आता थोडीशी वेगळी गोष्ट म्हणजेच या पृथ्वीवर त्याचा जन्म कसा होणार ते मी सांगते.'' परी म्हणाली, ''राधा बाळ श्रीकृष्णाचा जन्म तर कारागृहात बंदी शाळेत झाला होता, त्यावेळेस घोर काळोख होता. अशा परिस्थितीत श्रीकृष्णाचा जन्म झाला असे म्हणतात. पण त्यामागचा आध्यात्मिक अर्थ वेगळा आहे. आता मात्र सारे विश्व आज अज्ञान अंधकारात बुडले आहे व सर्व धर्मांची अति ग्लानी झालेली आहे. घोर कलियुगाचा अंधकारात प्रकाशाची ज्योत शिव परमात्मा आपल्याला सर्वांना दाखवत आहेत. आपण ईश्वराला जन्मोजन्मी आळवत आलो आहोत. हे ईश्वरा आम्हाला या दुःख अशांतीतून आम्हाला बाहेर काढ. आम्हाला मुक्ति दे असे आपण जन्मोजन्मी आळवले. त्यासाठी स्वतः

ईश्वर येऊन या अज्ञान अंधकारातून मनुष्य आत्म्यांना बाहेर काढण्यासाठी शिव परमपिता परमात्मा या धरतीवर येऊन प्रजापिता ब्रह्माबाबांद्वारे सर्वांना ज्ञान देऊन सद्‌गती करत आहेत. शिवपिता ज्ञानप्रकाशाद्वारे आपली आध्यत्मिक ज्योत प्रज्वलित करतात. राजयोग शिकवतात म्हणजेच आपल्यातील पूर्वकर्मांची बीजे नष्ट करण्याचा उपाय शिकवतात. मनुष्य आत्मा सत्त्वगुणी बनण्याचा हा एकमेव उपाय आहे. श्रीकृष्ण ही देवता संपूर्ण सत्त्वगुणी आहे. योगसाधनेद्वारे सत्त्वगुणी बनणे म्हणजेच श्रीकृष्णासमान आपणही देवत्व प्राप्त करणे होय. जणू काही नुतन सृष्टीची स्थापना याद्वारे घडते. अशा सत्त्वगुणी सृष्टीचे पालनपोषण करायला त्या योग्यतेचा शासकही हवा ना ! जसं स्वराज्य स्थापनेसाठी शिवाजी महाराजांसारखा योग्य माणूस त्या काळात होऊन गेला तसेच संपूर्ण सृष्टीच्या पालनपोषणाकरिता तितक्या योग्यतेचा राजा हवा ना! शिवाजी महाराजही श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर्श बाळगत म्हणजेच त्यांनाही श्रीकृष्ण ही पूजनयोग्य देवता वाटे. अर्थात श्रीकृष्णला जणू राजाधिराज महाराज म्हणायला हवे. खरे तर विश्वमहाराजन म्हणता येईल. हे सगळं घडावं म्हणून शिवपिता मानवास सत्त्वप्रधान बनवीत आहेत. एखादा विशेष दर्जाचा माणूस येणार म्हटल्यावर आपण त्यानुसार स्वागताची तयारी करतो त्याप्रमाणे सत्त्वप्रधान देवतेच्या आगमनासाठी सृष्टीही तशीच चांगल्या अवस्थेत हवी. आताच्या सृष्टीच्या अवस्थेकडे पाहता इतके प्रदूषण आहे, लोकसंख्या प्रचंड झाली आहे अण्वस्त्रांची समस्या मोठी आहे, अनेक कटकटी आहेत. अशा सृष्टीवर श्रीकृष्णासारखी देवता कशी अवतरित होईल?'' परी म्हणाली, ''सृष्टी सत्त्वप्रधान झाली की ज्यांच्या अंगी देवत्व असेल त्यांना अशा जगात सहज प्रवेश मिळेल. श्रीकृष्ण व श्रीराधा हेच पुढे स्वयंवर झाल्यानंतर श्री नारायण श्री लक्ष्मी बनतात. एवढं बोलून परीने विमान खाली उतरवलं व ती अंतर्धान पावली. विमान पण दिसेनासे झाले व मला जाग आली. राधा मैत्रिणींना हसत हसत म्हणाली माझी गोष्ट सर्वांपेक्षा छान आहे ना तिच्या सर्व मैत्रिणी खुश झाल्यावर त्यातल्या एकीनं म्हटलं हे तर आम्हाला माहीतच नव्हतं बघ. लवकरच श्रीकृष्णाचा जन्म या धरतीवर होणार आहे. एवढ्यात बाबा बाहेरून आले. राधा धावत बाबांकडे गेली हात पाय धुवून त्यांनी तिला जवळ घेतलं. घोळक्यात जाऊन ते राधेच्या मैत्रिणींच्या जवळ बसले. राधा म्हणाली, ''बाबा आज आमच्या गप्पा खूप छान रंगल्या होता. श्रीकृष्ण लवकरच येणार आहे हे परीने मला सांगितले तेच मी ह्यांना सगळ्यांना सांगितले.'' एवढ्यात राधाची मैत्रीण म्हणाली, ''काका आमच्या साऱ्यांपेक्षा राधाची गोष्ट खूपच निराळी होती. आम्ही सर्वांनी श्रीकृष्णाच्या लीला सांगितल्या. राधेने मात्र श्रीकृष्णाविषयी फारच वेगळी माहिती दिली.''

बाबा लगेच म्हणाले, 'हो बाळा, हे अगदी सत्य आहे. आता या कलियुगाची अंतिम वेळ आलेली आहे. आता युगपरिवर्तनाचा काळ आहे. अधर्माचा विनाश अज्ञान अंधकार विनाश. श्रीकृष्ण हा सत्ययुगाचा प्रथम राजकुमार श्रीकृष्ण जन्माला येणार. या पृथ्वीवर श्रीकृष्णाचे म्हणजेच श्रीनारायणाचे एक धर्म एक भाषा एक मत असे राज्य येऊ घातले आहे. संपूर्ण समृद्धी सुख शांती नांदेल. हे राज्य लवकरच सुरू होणार. म्हणजेच श्रीकृष्ण लवकरच जन्माला येणार बरं! राधाची आई म्हणाली, ''आता खूप वेळ झाला आहे तुम्ही सर्वांनी ही भेळ खा व सरबत पिऊन घ्या.'' राधा म्हणाली, ''हो आई खूप भूक लागली बघ. बोलण्यामध्ये आम्ही सर्वजण विसरूनच गेलो.'' राधा मैत्रिणीला म्हणाली, ''आपण साऱ्यांनी बाबांची आठवण करूया आणि दोन मिनिटं शांत बसून बाबांचे धन्यवाद करूया. मी मनातल्या मनातच पुटपुटले, शिवबाबा तुझ्या आठवणीमुळे मला मिळाला प्रेमाचा गोडवा. तुझ्या हृदयात आहे माझी जागा, कसं सांगू. या जगाला तुझ्याशिवाय मला कोणी नाही या जगात.'' मग आम्ही सर्वजण बाबांच्या आठवणीत भेळ व सरबत घेतलं. मग सर्वजण आपापल्या घरी गेल्या. राधा पण बाबांशी शांतपणे गप्पा मारत बसली.

***

(पृष्ठ क्र. १८ वरून)

घ्यावा लागत नाही, किंवा तिच्यामागे धावावं लागत नाही.

खरंच! सिस्टर मोनिका ह्यांचा हा जीवन परिवर्तित करणारा अनुभव आपल्यासाठीही फार प्रेरणादायी आहे.

**(भावानुवाद ब्र.कु. दुर्गेश, ठाणे)**

***



# चिंतन
## विष कशाला म्हणावे?
ब्र.कु. रामसिंह, रेवाडी, हरियाणा

''गरजेपेक्षा जास्त गोष्टी विषासमान...''

कुणीतरी चाणक्यांना विचारले, 'विष काय आहे? (विष कोणते?) चाणक्य उत्तरले, ''जी आयुष्यात गरजेपेक्षा जास्त असते (मिळते) ती प्रत्येक गोष्ट विषासमानच होय. मग ते धन-संपत्ती असो की शक्ती असो, लालूच, अभिमान, गर्व असो अथवा प्रेम किंवा मग एखादी महत्त्वाकांक्षा असो. माणसाने पाण्यासारखे बनावे. पाणी स्वतःची वाट स्वतःच तयार करते, परंतु दगडासारखे कदापि नसावे. मोठे खडक दुसऱ्यांच्या मार्गात बाधा (अडथळा) आणतात. जेव्हा आपली दृष्टि आपल्या साध्यावरून दूर जाते. तेव्हा अडथळे दिसू लागतात. उत्साही व्यक्तीला जगात असाध्य असे काहीच नाही. जसे म्हणतात ना, झाडाच्या फांदीवर बसलेला पक्षी फांदी कितीही हलली, तरी घाबरत नाही, कारण पक्षी फांदीवर नव्हे तर आपल्या पंखांवर विश्वास ठेऊन असतो. म्हणूनच स्वतःवर, स्वतःतील क्षमतेवर विश्वास ठेवा. जेव्हा आपण स्वतःला अधिक चांगले बनवण्याच्या प्रयत्नात असतो, तेव्हा सर्वच अधिकाधिक चांगले होऊ लागते. म्हणजे काय, तर स्वतःमध्ये खरेपणा आणि हिंमत असेल, तर बंद दरवाजेही आपोआपच उघडतील ह्यात शंकाच नाही. एखाद्यामध्ये गुण असणे, हा काही योगायोग नव्हे.

शुभ भावना, चांगले मन, दयाळुपणा, सातत्य आणि बुद्धिमान असणे ह्या गुणांची पराकाष्ठा व्हावी. जेव्हा एखादा मनुष्य मोठ्यामोठ्या गोष्टी करतो, तेव्हा तो शहाणा झाला आहे असे म्हणणे योग्य होत नाही, पण यासाठी प्रयत्नशील असावे. जेव्हा तो छोट्या छोट्या गोष्टी समजू लागेल. तेव्हा तो शहाणा झाला असे म्हणता येईल. महान व्यक्ती त्यांच्या वागण्यातून आपल्यासारख्या सामान्य माणसाला हीच जाणीव करून देत असतात, तुम्हीही महान बनू शकता. माणसाची सर्वात मोठी संपत्ती कोणती असेल, तर ती त्याची बौद्धिक शक्ती आहे. तसेच सर्वात शक्तीशाली शस्त्र कोणते, तर ते धैर्य असेच म्हणावे लागेल. सर्वात मोठी सुरक्षितता म्हणजे विश्वास (एखाद्याचा विश्वास संपादन करणे) आणि सर्वात प्रभावशाली अस्त्र म्हणजे हास्यच म्हणावे लागेल.

कर्म आणि भाग्यातील अंतर : लोक म्हणतात की ईश्वरच सर्व मनुष्यांना भाग्य वाटतो. पण असे जर असते, तर ईश्वराने सर्वांना खूप चांगले भाग्य दिले असते. (सर्वांचेच भाग्य खूप चांगले लिहिले असते.) ज्यामुळे ह्या जगात कुणालाच दुःख मिळाले नसते. पण खर सांगू का ह्या बाबतीत हा सर्व लोकांचा भ्रमच म्हणावा लागेल. खरं म्हणजे ईश्वराने प्रत्येक व्यक्तीला कर्म रुपी (चांगले/वाईट) एक अशी लेखणी दिलेली आहे, त्याद्वारे प्रत्येक जण आपले भाग्य हवे तसे लिहू शकतो. मनुष्य स्वतःच चांगले अथवा वाईट कर्म करून त्याप्रमाणे आपल्या भाग्याचे निर्माण करत असतो. म्हणूनच जर असे असेल, तर त्यासाठी मग तो कुणालाच दोष देऊ शकत नाही. कर्म आणि भाग्य (जसे कर्म तसे फळ, जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे ईश्वर) ह्यांचे वास्तविक खरे रुप हेच.

जसे म्हणतात ना खर्‍यासाठी कुठल्याही आणाभाकांची गरज नसते. नदीला वाहण्यासाठी रस्त्याची गरज नसते. ती आपला रस्ता स्वतःच बनवत जाते. जे लोक ह्या जगात स्वबळावर जगत असतात, त्यांना आपले साध्य (लक्ष्य) गाठण्यासाठी कुठल्याही तकलादू आधाराची गरज नसते. जे दरवाजे आपल्यासाठी कधी उघडणारच नाहीत अशा दरवाजांवर थाप मारणे बंद करावे लागेल. म्हणूनच स्वतःची घरे स्वतःच तयार करा. त्याला दरवाजेही आपणच बसवावे जेणेकरून आपल्याला ते हवे तेव्हा स्वतःच्या इच्छेनुसार उघडता येतील.

(पृष्ठ क्र. २४ वर)




# आरोग्य रहस्य

**वैद्य सुविनय दामले, कुडाळ**

**शरीरमाद्यं खलु धर्मसाधन्' या न्यायानुसार शरीरस्वास्थ्य ठीक राहणे हे अध्यात्म साधनेत अति आवश्यक आहे. त्याकरिता काही वेचक आणि वेधक टीपा या लेखमालेद्वारे देत आहोत. वाचकांना लाभ होत राहो हीच कामना – संपादक**

**अ. अन्नशुद्धी**

रासायनिक खतांच्या विषारी अवगुणांपासून आपली सुटका तर नाहीच.

ती तर प्रत्यक्ष अन्नामधे, भाज्यांमधे, साखरेमध्ये, दुधामध्ये, औषधांमध्ये, हवेमध्ये आणि आता विचारांमध्ये देखील आली आहे. गरज आहे ती शुद्धीकरणाची! अंतर्बाह्य शुद्धीकरण! अगदी प्रसन्न आत्मा, इंद्रिय, मनापर्यंत.

जेवढे आपल्यापरीने शुद्ध राहता येईल तेव्हढे राहायचे. जेवढे शक्य आहे तेवढे सर्व प्रयत्न 'मनापासून' करून 'अशुद्धी' बाहेर काढून टाकण्याचा प्रयत्न करायचा. एवढंच आपल्या हाती.

समुद्रासारखं व्हायचं. समुद्र आतमध्ये काहीही घाण सामावून घेत नाही. जे काही आत नको असेल ते ते सर्व बाहेर किनारपट्टीवर आणून टाकायचे! अगदी अनावश्यक विचारसुद्धा! मनापासून केलं तर नक्कीच यश मिळते.

खाताना जेवढे शुद्ध सात्त्विक खाता येईल तेवढे खायचे. म्हणून तर आपण अन्नावर वेगवेगळे संस्कार करतो, ते त्यातील विष निघून जाण्यासाठीच!

धान्यांच्या बाबतीत, वावरणे म्हणजे वारा देणे, निवडणे, आसडणे, पाखडणे, चाळणे, घोळणे, धुणे हे झाले प्राथमिक शुद्धी संस्कार.

नंतर चिरणे, कापणे, फोडणे, वाफवणे, उकडणे, शिजवणे, तळणे, परतणे, गाळणे, फुलवणे, फुगवणे, आंबवणे, भाजणे हे सर्व संस्कार आपण अन्नावर दररोज अगदी सहजपणे करत असतो.

**कशासाठी?**

अन्न सहज पचावे, याकरिता सोयीचे व्हावे म्हणून केले जाणारे हे शुद्धी संस्कार! प्रत्यक्ष पदार्थातील विष वेगळे. त्यामुळे त्याची शुद्धी वेगळी. जसे मोहरी धुण्यासाठी माझी आई, मोहरी पाण्यात घोळून धुवायची.

एका मोठ्या पातेल्यात पाणी घेऊन एक वाटी हातात, त्या पाण्यात धरून हलवत राहायची. दुसऱ्या हाताने मूठमूठ मोहरी घेत त्या वाटीवरून हलकेच सोडायची. म्हणजे मोहरीतील बारीक दगड पाण्यात घोळल्यामुळे वाटीत आपोआपच तळाला बसायचे. वरची शुद्ध मोहरी पातेल्यात यायची. दगड वाटीत जमा व्हायचे आणि नंतर पातेल्यातील मोहरी पंचावर पसरून वाळवायची.

काही पदार्थांची शुद्धी होऊच शकत नाही., म्हणजे जर्सी गाईच्या दुधाची शुद्धी कशी करणार? अंड्याच्या ऑम्लेटवर गोमूत्र जरी शिंपडले तरी त्याचे थालीपीठ थोडेच बनणार?

दूध उकळून किंवा सूंठ, आले, मिरी, बाळशेप इ. औषधे घालून देखील या दुधाची शुद्धी होणारच नाही. अशावेळी या पदार्थांना आपल्या आहारातून कायमचे हद्दपार करणे, हाच सर्वोत्तम उपाय ठरतो.

अशी शुद्धी जर प्रत्येक पदार्थाची करायची ठरवले तर अन्नशुद्धी फार कठीण नाही.

पण वेळच नाही हो, कसं जमणार, जागाच नाही, माहितीच नाही, आईने शिकवलेच नाही, करायचं कुणी अशा वैचारिक द्वंद्वात सतत राहिल्यामुळे आयुष्य कमी झालं तरी चालेल; पण हे 'असलं कालबाह्य' काही करायची आमची मानसिक आणि शारीरिक तयारी नाही, असं म्हणून कसं चालेल? कुछ (१०० बरस) पाने के लिये कुछ खोना पडता है ! जिंदगी पाने के लिये 'गंदगी' को हटाना जरूरी होता है!

***

# दादी रतन मोहिनी यांचे काही मौलिक विचार



१) केवळ अधिकारी होणे म्हणजे न्यायवादी होणे नव्हे. आपण स्वत:च स्वत:ची तपासणी करावी – आपले मन, बुद्धि, संकल्प शांत आहेत का?

२) आपण आपली कमतरता लपवण्यासाठीच प्रयत्नशील असतो. त्यावर उपाय योजना करण्यापेक्षा आपण त्याच त्याच चुकांची उजळणी करत बसतो. निसर्ग आपल्यातील सकारात्मक अथवा नकारात्मक तरंगांप्रमाणे चालत असतो. आपण स्वत:वर काम केले, तर नैसर्गिक आपत्तींपासून सहज वाचू शकू.

३) आपण हे तपासून पाहावे, की आपण किती आणि काय काय बोलतो. अती बोलण्याने स्वत:तील शक्ती क्षीण होतात आणि मग स्वत:मध्ये एक प्रकारचा पोकळपणा निर्माण होतो. तर श्रेष्ठ भावनांना अजून श्रेष्ठ करण्यासाठी माणसाने कमीत कमी शब्दांचा उपयोग करावा. स्वउन्नतीसाठी अंतर्मुखतेबरोबरच आत्मावलोकनही करावे. लक्षात असू द्यावे. शब्दांचा बाण स्थूल बाणांपेक्षाही जास्त घायाळ करतो. म्हणूनच आपले शब्द जपून वापरावेत.

४) जगात आर्थिक महागाई तर दिवसेंदिवस वाढतच आहे. परंतु त्याचबरोबर दुर्दैवाने क्रोध, राग, छळ-कपट, असूया ह्या भावनादेखील वाढत आहेत. प्रत्येकाचाच हा अनुभव आहे. कुणालाच समाजात वाढणाऱ्या ह्या वाईट गोष्टींची जाणीव होत नाहीये. ही खूपच चिंतनीय बाब आहे. आता आपण फक्त ही आशा ठेवू शकतो. त्या परमेश्वराकडे ही प्रार्थना करू शकतो, की लोकांनी आता सामाजिक मूल्यांना ही समजून महत्त्व द्यावे. तसेच जीवनात शांती मिळवण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

५) आपण जीवनात नेहमीच नकारात्मकता अनुभवत असतो. आपल्याला ज्या गोष्टींची जास्त आवश्यकता आहे. त्याप्रमाणे आपण आपले जीवन घडवत असतो. त्यावरूनच ठरवतो 'मी कोण?' प्रत्येक गोष्टीतून वाईट अर्थ काढण्यापेक्षा आपण आपले अंतरंग स्वच्छ करावे. व्यक्तीगत, आंतरिक उन्नतीसाठी आपण स्वकेंद्रीत होऊन विचार करावा. हे समजून घ्यावे की, आपले कामच जीवनाला आकार देत असते. दुसऱ्यांना 'ह्याने बदलले पाहीजे – आता तरी सुधार.... अशी प्रतिक्रिया न देता आत्मोन्नतीलाच प्राधान्य द्यावे.

६) दुसऱ्यांचा हेवा दावा करणे सोडून आपण स्वत:कडे लक्ष द्यावे. स्वत:मध्ये बदल घडवणे केव्हाही श्रेष्ठ ठरते. अशानेच आपण यशाच्या शिखराकडे झेपावत असतो. बुद्धी प्रगल्भ होत असते. सर्वांचे सर्वच ऐकले पाहिजे हा अट्टाहास न करता, मी आत्मा राजा आहे. ऐकण्याच्या शक्तीला कानाला आज्ञा करावी की तुला श्रेष्ठ तेच ऐकायचे आहे. ऐकलेल्याचा प्रभाव स्वत:वरही पडत असतो. तशाच अर्थाचे शब्द मग आपल्याही मुखातून निघतात, आणि ती ऐकण्याबोलण्याची सवयच तुमचे व्यक्तिमत्त्व विकसित करीत असते. म्हणूनच नकारात्मक गोष्टींपासून स्वत:ला वाचवणे इष्ट ठरते.

७) मी लोकांना (घराच्या), निवाऱ्याच्या शोधात भटकताना बघितले आहे. प्रत्येक व्यक्तींचे स्वप्न असते, की त्याचे स्वत:चे असे सर्व सुख सोयींयुक्त घर असावे. लोक पैसा कमावतात तोच मुळी असे स्वप्नांचे घर बांधण्यासाठी. पण शेवटचा (इहलोकी परतण्याचा प्रवास) प्रवास मात्र ह्याच घरापासून सुरू होतो. तेच घरटे ज्याला

बनवण्यासाठी लोक आपले सर्वस्व पणाला लावतात. आता मात्र आपले स्वत:चे खरे घर कोणते, ते जाणून घेण्याची खरी वेळ येऊन ठेपली आहे. त्यासाठी मी कोण आणि माझे घर कोणते जिथून मी ह्या पृथ्वीरूपी रंगमंचावर पात्र रंगविण्यासाठी आलो होतो आणि आता तिथेच मला परतायचे आहे. हे जाणून घेण्याची वेळ आलेली आहे.

८) प्रत्येकालाच वाटत असते की, समोरच्याने मला समजून घ्यावे. माझ्यावर खूप प्रेम करावे. पण जेव्हा स्वत:ला जाणून घ्यायची वेळ येते की, 'मी कोण?' तेव्हा मात्र मनुष्य ते समजू शकत नाही - हे सत्य आहे. पण अचानक परिस्थिती ओढवली असता तो म्हणतो की, 'अहो, मला काय स्वप्न पडले होते का की, असे काहिसे अघटित घडेल?... मी हे-हे कार्य करू शकणार नाही, माझ्यात ती शक्ती नाही. मी त्या प्रकारचा मनुष्य नाही हो...' पण स्वत:ला समजून घेणे म्हणजे स्वत:ला स्वत:तील गुण दोषांसकट स्वीकारणे. स्वत:ला जाणणे मी हे नश्वर शरीर नसून एक चैतन्यमय शक्ती आत्मा आहे. आणि मीच माझ्यातील दोषांचे निवारण करू शकतो. मी अती शक्तीशाली ऊर्जा आहे.

***

---

(पृष्ठ क्र. ९ वरून)

कोणी दादी, वरिष्ठ भाई भेट देत राहिले. १९९० पासून अव्यक्त होईपर्यंत आदरणीय जगदीश भाईंनी ज्ञान, योगाद्वारे संगोपन दिले. रशिया व आसपासच्या देशांत ईश्वरी सेवेचा उत्साह वाढतच गेला. संतोष दीदींच्या मार्गदर्शनात सेंट पीटर्सबर्ग येथील ब्र.कु. कल्चरल ग्रुप मधुबन मुख्यालयातच नव्हे तर राष्ट्रपती भवनसहित भारतातील अनेक शहरांमधे शिवबाबांचा संदेश देण्याची सेवा करत आहे. आज ३४ वर्षांचे अनुभवी सेवाकेंद्र म्हणून सगळे माझं कौतुक करतात. सत्ययुगी सृष्टीचे आवाहन करताना, विश्व महापरिवर्तनाची अंतिम वेळा समीप येत असल्याचीही मला जाणीव आहे. त्यावेळेस दोन्ही बाहू पसरून बाबांच्या मुलांना सुरक्षित निवारा देण्यासाठी मी ठाम उभा असेन याची खात्री आहे. सर्वांना सुख शांतीमय, सुरक्षित वातावरण लाभो ही शुभभावना बाळगून आता इथेच थांबतो. ओम शांती.

**संदर्भ : युट्यूब प्रभू परवाने (फिल्मस डिविजन ऑफ ब्रह्माकुमारीज)**

***

---

(पृष्ठ क्र. १२ वरून)

होऊन नवीन खाते सुरु होईल. तुमच्या नव्या जन्मात हे शिक्षण घेत तुम्ही इतके पुढे जाल की आजचे धनाढ्य काहीच नाहीत. कारण तुमचे खातेच नव्या पद्धतीने सुरु होते. तुम्हाला जुन्या सर्व कर्माचा हिशोबातून मुक्ती मिळेल, तर तुम्ही पुढच्या जन्मी चांगल्याच कुळात (राजा-महाराजाच्या) जन्म घ्याल ना! असे शिक्षण ब्रह्माकुमारी मध्ये दिले जाते. म्हणूनच तुम्ही आजपासूनच थोडा थोडा वेळ हे ज्ञान ऐका असे मला वाटते. बाहेर शाळा कॉलेजात जसे शिक्षण असेल, तसे आपापल्या योग्यतेनुसार बसवतात. पण इथे ही खास गोष्ट आहे की लहान मुले, तरुण, वृद्ध सगळेच एका छताखाली असून एकसारखे शिक्षण धेतात. हेच शिक्षण तुमच्याबरोबर पुढील अनेक जन्म तर येतेच पण तुमचे मागील कार्मिक खाते संपवण्यात हातभार लावते. गंमत म्हणजे हे शिक्षण ही नि:शुल्क आहे. ह्या विश्व विद्यालयात ईश्वराने सर्वांचीच फी माफ करून टाकली आहे.

हे सर्व ऐकून सगळेच इतके खुश झाले की सर्वांनी साप्ताहिक कोर्ससाठी तयारीही दर्शवली. मला वाटले की बाबांनीच माझ्याकडून हे सर्व ज्ञान त्या आत्म्यांना दिले. कारण ते इतके अचानक आले की माझी काही तयारी नव्हती. हाही बाबांनीच मला एक अनुभव करवला. पुन्हा एकदा निमित्तपणाचा भाव जागृत झाला. बाबा तुमचे खूप-खूप आभार. कर्ता करविता बाबा कुणाचे कल्याण करायचे असेल, तर स्वतः प्रवेश होऊन त्या आत्म्यांना त्यांच्या भाषेत ज्ञान देतात. ह्याचा अनुभव आल्याने मी ही तृप्त झालो. मेरा बाबा! मीठा बाबा! प्यारा बाबा! शुक्रिया बाबा!


***

---

(पृष्ठ क्र. २१ वरून)

**काळ बदलायचा असेल, तर आधी जो काळ चालू आहे, त्याचा स्वीकार करावा. काळाबद्दल तक्रार करणारे काळाचे सावज बनतात, काळाचे परिवर्तक नव्हे.**

***




# ‘आत्म उन्नतीचा मार्ग सापडला’

**ब्र.कु. संजय दुधाणे, पुणे, Sports Journalist**

मी संजय दुधाणे, मी पुण्याचा. पुण्याच्या महाळुंगे सेंटरवरून मला पुन्हा एकदा माउंट आबूच्या पवित्र भूमीत येण्याच भाग्य लाभले आहे. मूळात मी क्रीडा पत्रकार, क्रीडा लेखक आहे. आत्तापर्यंत मी ३ ऑलिम्पीक कव्हर केले आहेत. भारताने ज्या ऑलिम्पीक मध्ये २१ पदकं जिंकली, ते प्रत्यक्षात पाहण्याचं भाग्य मला मिळाले आहे. मी आत्तापर्यंत ४ एशियन गेम्स कव्हर केलेत. तसेच ४ वर्ल्डकप क्रिकेट मॅचेसही कव्हर केल्या आहेत. असा समग्र अनुभव असताना, खेळाडूंसाठी खरं तर ध्यानाची प्रक्रिया काय असते, हे जाणून घेण्याच्या शोधात असताना मला ब्रह्मा कुमारींबद्दल कळाले. मूळातच ब्र.कु. म्हटले की आपल्याला श्वेत वस्त्रधारण करणारे बहिण-भाऊ दिसतात. ह्या कलियुगात वावरताना ब्र.कु. हा विशिष्ट वेगळा कुठला तरी वर्ग आहे, असा गैरसमज सर्वत्र पाहावयास मिळतो. पण जेव्हा मी Sports Conference च्या निमित्ताने पहिल्यांदा आबूला गेलो, तेव्हा माझे सर्व गैरसमज दूर झाले. खऱ्या अर्थाने परमेश्वराकडे जाण्याचा मार्ग सापडला. खरे तर मला आत्ताच ह्या पवित्र वास्तूत असताना मी सत्ययुगात आहे असाच भास होतोय. दोन दिवसांपूर्वीच मी पाण्डव भवन येथे गेलो होतो. तिथले चार धाम बघितले. हिंदू असल्याने माझ्या घरात बऱ्याच जणांनी चारधाम यात्रा केलेली आहे. हिंदू धर्मात म्हणतात की चार धाम यात्रा केल्याशिवाय तुमचे मानवी जीवन सफल होत नाही. पण जेव्हा मी बाबांची चारधाम यात्रा केली, तिथे बसून मी एक छोटासा लेख लिहला. तेव्हाचा आनंद मी शब्दांत वर्णन करू शकत नाही. विशेषतः बाबांच्या पर्णकुटीत आत्मानुभूती – साक्षात बाबा समोर आहेत आणि आपल्याला मार्गदर्शन करत आहेत हेच जाणवत होते.

मी अनेक पंथ शोधले, त्यांचा अभ्यास केला, आपल्याकडील आध्यात्मिक परंपरा फार जुनी आहे. जसे वारकरी संप्रदाय, स्वामी विवेकानंद... पण इथे येऊन ज्ञानाच्या मार्गातून तुमची आत्मोन्नती कशी होते, त्याचा मार्ग मला सापडला. स्पोर्टस् कॉन्फरेंसच्या निमित्ताने बघितलेले मा. आबू मला फार आवडले. मला वाटते जणू मी कलियुगातून सत्ययुगात आलो आणि परत जाईन तेव्हा ह्या सत्ययुगातून पुन्हा कलियुगात. इथे येऊन आत्म्याची गेलेली बॅटरी पुन्हा चार्ज होते, असे अनुभवले. मला जेव्हा जेव्हा वाटेल, तेव्हा मी इथे परत परत येऊन माझी बॅटरी चार्ज करून घेईन. हे नक्की. आता ब्रह्माकुमारी संस्था काय करते ते बघू. ह्या संस्थेच्या २२ विंग्ज आहेत, त्यांच्याद्वारे मोठ्या प्रमाणावर समाजसेवा चालते. तसेच ब्र.कु.चा सौर ऊर्जा प्रकल्प पाहून मी खरंच खूप थक्क झालो. मित्रांनो, हा त्यांचा प्रकल्प अनेक एकर्सवर पसरलेला आहे. विज्ञानाच्या आधारे देवत्व कसे प्राप्त करायचे ह्याचे धडे इथेच शिकवले जातात.

खरं तर स्वामी विवेकानंदांनी सांगितले होते मी, जग बदलायचे असेल, तर कोणती ध्यान धारणा करावी, त्याची पद्धत काय आहे, त्यासाठी कोणकोणती पावले उचलायला हवी. पण त्याच्याही पलीकडे जाऊन प्रगती कशी साधता येईल हे इथे येऊन मला कळाले. ह्याचा मला फार फार आनंद होतो. मागच्या वेळी मी क्रिडा पत्रकार असल्याने त्या परिषदेला आलो होतो. पण ह्या वेळी महाळुंगे सेवाकेन्दातर्फे मला मिडिया विंग मध्येही यायला मिळाले आणि मी परत तीच अनुभूती घेतली – स्वर्गीय अनुभूती. ह्यांची शिस्त बघून मी अचंबीत झालोय. मी खरंतर ऑलिम्पिक, एशियन गेम्स पाहिलेत, भारतात झालेला वर्ल्ड कप असू दे, जो

(पृष्ठ क्र. २७ वर)



# "अंग-अंग फुलागत उमलले"

**ब्र.कु. शेखर, हसनपूर, हरियाणा**

माझा जन्म महाराष्ट्रातील नाशिक रोडला गोदा किनारीचा, परंतु पुढील पालनपोषण मात्र हरियाणातील यमुनेकाठी हसनपूर मध्ये झाले. सर्वजण मला म्हणायचे तू गुरू कर. गुरुशिवाय काही खरं नाही. मला वाटायचे गुरू तर मी करीन. पण ते काय माहीत कोणत्या देवाचा जप, पूजा, मंत्र करायला सांगतील? आमच्या घरात वडिलोपार्जित, म्हणजे आमचे पणजे, आजोबा, बाबा, शिव परमात्म्याचीच पूजा करत आलेत. शिवाची पूजा म्हणून गुरु करणे जमले नाही.

**एकातच वडील, शिक्षक आणि सद्गुरु तिन्ही भेटले.**

एक दिवस मी असाच रस्त्याने जात असता, वाटेत ब्रह्माकुमारी सेंटर लागले. इथे काय चालते, हे पाहावे तर या उत्सुकतेपोटी मी आत सेवाकेन्द्रात डोकावले. तर तिथे निमित्त ताई उभ्या होत्या. त्यांनी मला आत बोलवून बसवले. शिवबाबांचा परिचय दिला आणि खाऊ पण दिला. बाबांचा सत्य परिचय मिळताच मी जणू काही हरखूनच गेलो. बाबांकडे खेचलो गेलो. मग बहिणीने माझा साप्ताहिक पाठ्यक्रम करवला. शिवबाबांचा परिचय मिळताच अंतर्मनास एवढे सुख वाटले की काय सांगू? ते सुख आजपर्यंतच्या आयुष्यात मी कधीच अनुभवले नव्हते. रोम-रोम पुलकित झाले. अंग-अंग मोहरले जणू, फुलासारखे उमलले. एका शिवबाबातच वडील, शिक्षक आणि सद्गुरु सर्वच भेटले. बहिणीने शिकवले की, आत्मा अजर-अमर-अविनाशी आहे आणि परमात्मा शिव आम्हा सर्व मुलांचे पिता आहेत. हे सर्व खूप छान उमगले. त्यामुळे त्याच दिवसापासून मी बाबांचा पक्का बच्चा बनलो आणि माझा पक्का निश्चय ही झाला. बाबांना म्हटले की, 'बाबा, तुम्हीच माझे खरे वडील आहात. तुम्ही ५००० वर्षांनंतर भेटलात...' मग मी माझ्या पत्नीलाही शिवबाबांबद्दल सर्व सांगितले तिलाही ते आवडले. साप्ताहिक पाठ्यक्रमानंतर ती ही ज्ञानात यायला लागली. आज आम्हाला ज्ञान घेऊन जवळ जवळ २५ वर्षे झाली.

**बाबांनी नवजीवन दिले.**

जेव्हा मी साठीच्या (६०) आसपास गेलो, त्यावेळी मला अचानक ३-४ प्रकारचे आजार बळावले. कावीळ मोठ्या प्रमाणावर झाली, दिवसें दिवस ती वाढत होती. पित्ताशयात खडा झाला. त्यामुळे डॉक्टर्स पोटात अन्न वेगळ्या मार्गाने देत होते. ह्या सर्वांमुळे पोट एखाद्या फुग्यासारखे टम्म फुगले होते, दिले गेलेले अन्न त्यात एकत्रित होत होते आणि तेथेच पडून पडून ते सडतही होते. त्यामुळे मग अन्न विषबाधा झाली. ते इतके भयंकर होते की ऑपरेशन करायची पाळी आली डॉक्टर म्हणाले, ह्याचे ऑपरेशन करावे लागेल, पण लक्षात घ्या ऑपरेशन करते वेळी पोट फुटूही शकते, अशावेळी विष पसरले, तर ह्यांचे वाचणे कठीण आहे. तरी हिंमत करून ऑपरेशनसाठी इस्पितळात दाखल झालोच. डॉक्टरांनी मला बेशुद्ध केले. ऑपरेशच्या वेळी माझ्या तोंडात नळी आणि तार असे एकत्र पोटाच्या त्या घेऱ्यात एका बाजूला टाकून ठेवले होते. नळी आणि तार गळ्यात थोडी जरी जास्त आत ढकलली तरी जीव गुदमरत होता. म्हणून डॉक्टर परत-परत नळी आणि तार आत टाकायचे आणि परत बाहेर ओढायचे. ही क्रिया बराच वेळ चालू होती. मला आता थोडी शुद्ध येत होती. एकदा तर नळी+ तार टाकून (घशात) डॉक्टर विसरूनच गेले. बराच वेळ झाला आणि मला श्वास घेण्यात अडथळा येऊ लागला. मी माझे हात पाय हलवून त्यांना तसे सांगण्याचा प्रयत्न करायला लागलो. पण माझे हात-पाय पट्ट्याने बांधले होते. हलत ही नव्हते. मी डॉक्टरांना तोंडातून आवाज देण्याचा प्रयत्न केला. पण छे सगळच व्यर्थ. तोंडात नळी+तार

असल्याने तेही शक्य झाले नाही. तोंडात दातांच्या मध्ये एक गोल चाक लावून ठेवले होते. ज्यामुळे तोंडातून आवाज निघणे कठिण होऊन बसले होते. आता माझा श्वास पूर्णपणे थांबला होता. मी दीर्घ श्वसन करायचा प्रयत्न करत होतो अशातच वाटायला लागले की आता आपले काही खरे नाही एखाद सेकंदातच मी गतप्राण होईन की काय!

मला पटकन शिवबाबांची आठवण आली. बाबांशी बोलायला लागलो. 'बाबा, तुम्ही माझे बाबा आहात. तुम्हाला सर्व माहिती आहे. एक तर मला वाचवा. नाहीतर हा अंतकाळ असेल तर मी तुमचीच आठवण करतोय-अंत मती सो गती।... तेव्हा अचानक डॉक्टरांचा मोठ्याने आवाज आला, 'नळी ओढा पटकन बाहेर, ह्यांना काही व्हायचे...' आठवणीतच हुजूर हाजिर झाला. मला जाणवायला लागले, की बाबा माझ्या जवळच बसले आहेत. क्षणात श्वासोच्छवास पूर्ववत झाला. मी मनातल्या मनात बाबांना म्हटले, 'बाबा डॉक्टरांना परत नळी घशात टाकू देऊ नका.' काही क्षणांत डॉक्टरांचा पुन्हा आवाज आला 'नळी बाहेर काढा, ऑपरेशन यशस्वी झाले आहे.' हे ऐकताच माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळू लागले. अश्रूधारा वाहू लागल्या. मी मनातल्या मनात बाबांचे आभार मानून म्हणालो, 'बाबा, ओ मीठे बाबा तुम्ही मला नवजीवन दिले की हो! आता हे जीवन आमरण तुमचेच. बाबा आणि माझ्यात बाप आणि मुलाचे सुंदर नाते आहे. स्वतःला आत्मा समजून परमात्म्याची आठवण करावी. हाच पहिला आणि शेवटचा धडा होय.

फक्त स्वप्न बघितल्याने काहीच होत नाही. यश मिळते ते फक्त प्रयत्नांनीच. म्हणतात ना - प्रयत्नांती परमेश्वर!

***

---

(पृष्ठ क्र. २५ वरून)
ऑस्ट्रेलियाने जिंकला, तो ही पाहिला. त्यात हजारो कार्यकर्त्यांची धावपळ मी बघितली आहे. पण ब्रह्माकुमारीजच्या पाण्डव भवन असो अथवा ज्ञानसरोवर, कॉम्लेक्स मध्ये तशी कोणतीही घाई गडबड दिसत नाही; पण अत्यंत शिस्तबद्ध काम आणि आध्यात्माबरोबरच मानवापासून देवत्वाकडील प्रवास ह्याच धार्मिक संस्थेत मी पाहिला. ह्या संस्थेशी आपलेही नाते जुळले आहे, ह्याचा फार आनंद होतो. माझी इच्छा आहे मी बाबांसाठी काही लिहावे. इथे बाबांना चिठ्ठी, पत्र लिहिली, इथे ही परंपरा आहे. आपल्या भावना थेट परमेश्वराकडे मोकळ्या करण्याचं एक प्रभावी माध्यम शिवबाबांनी आपल्या सर्वांना दिलंय. ह्यावेळी मी ही चिठ्ठी लिहिली, बाबांना माझ्या काही गोष्टी लिहून दिल्या. गेली अनेक दिवस मी आमच्या दीदी तसेच शिवानी दीदीकडून ऐकतोय की आपण फक्त घेणारा आत्मा नसून देणारा आत्मा आहोत. माझेही आता ह्या संस्थेप्रति काही देणे आहे. म्हणूनच बाबांसाठी मी काही लिहू शकलो, मिडीयातून ऑडिओ, व्हिडिओ करता आले तर तेही करायची इच्छा आहे. हा मार्ग मग ते तरुण, वृद्ध, महिला, बालक सर्वांनीच आत्मसात करावा.

मी माझ्या परवाच्या आर्टिकल मध्ये लिहिले की, 'चला परमात्म्याच्या चारीधामला' समस्त मराठी समाज आणि संपूर्ण महाराष्ट्राला माझे आवाहन आहे की, ह्या जन्मी एकदा तरी ही चारीधाम यात्रा केल्यास आपले जीवन निश्चितच सफल होईल. जीवनात उत्कर्ष होईल. तेव्हा आबूला जा आणि आपले जीवन धन्य करा.

***

---

## सुविचार

* आत्मविश्वास - आपल्या आयुष्यात धैर्य ठेवा. प्रत्येक गोष्ट त्याच्या वेळेतच होते! आपण धनाच्या श्रीमंतीमुळे कमावलेली माणसे आपल्या आयुष्याच्या शेवटच्या घडीपर्यंत साथ देतात! स्वतःच्या आत्मविश्वाची ढाल मजबूत असेल तर जगाने तुमच्या खच्चीकरणासाठी कितीही उलाढाल्या करू द्या, त्याने काहीही फरक पडत नाही!
* समाधानाने तोच हसू शकतो, जो दुसऱ्याचे कधीच वाईट चिंतीत नाही आणि वाईट करत ही नाही. तोच शांतपणे झोपू शकतो, जो इतरांच्या (चांगल्याचाच) भल्याचाच विचार करतो! त्यासाठी चांगले, सकारात्मक विचार हेच स्वस्त, मोफत आणि उत्तम औषध आहे!